मराठी-इंग्रजी एकत्रित

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

# महाराष्ट्र नागरी सेवा

## (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण)

# नियम, १९८४

# MAHARASHTRA CIVIL SERVICES

## (COMMUTATION OF PENSION)

# RULES, 1984

महाराष्ट्र शासनाचे वित्तीय प्रकाशन क्रमांक तीन

**FINANCIAL PUBLICATION OF THE GOVERNMENT OF MAHARASHTRA No. III**

प्रथमावृत्ती (पुनर्मुद्रण)

***FIRST EDITION (Re-print)***

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

२००५

[किंमत : रुपये २६.००]

# प्रास्ताविक

निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणासंबंधीचे नियम, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८१ या नावाने, दिनांक १० डिसेंबर १९८१ रोजीच्या शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आले होते आणि ते १ डिसेंबर १९८१ पासून अंमलात आले आहेत. त्या नियमांमध्ये, मुंबई नागरी सेवा नियम, १९५९-खंड एक व दोन मधील निवृत्तिवेतनविषयक नियमांचे संदर्भ दिले होते. मुंबई नागरी सेवा नियम, १९५९-खंड एक व दोन यांमधील निवृत्तिवेतनविषयक नियम निरसित करून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ हे, १५ ऑगस्ट १९८२ पासून अंमलात आलेले आहेत. हे निरसन झाल्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८१ यामध्ये दिलेले मुंबई नागरी सेवा नियम, १९५९-खंड एक व दोन यांमधील विविध नियमांचे संदर्भ वगळण्यासाठी, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८१ यामध्ये सुधारणा करणे आवश्यक झाले.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८१ यात सुधारणा करण्याऐवजी, सुलभ संदर्भासाठी अद्यावत बियम प्रसिद्ध करण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्यानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ हे, शासकीय अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक एमएससी. १०८४/९/एसईआर-६, दिनांक १९ जुलै १९८४ या अन्वये प्रसिद्ध करण्यात आले असून ते दिनांक १५ ऑगस्ट १९८४ पासून अंमलात आले आहेत.

३ या प्रकाशनाच्या शेवटी केवळ संदर्भासाठी इंग्रजी-मराठी व मराठी-इंग्रजी "शब्दावली" देण्यात आली आहे.

४ या नियमांचा मराठी अनुवाद देखील या पुस्तकात दिलेला आहे.

**व्यं. दे. पानसे,**
शासनाचे सह सचिव.

दिनांक : १९ जुलै १९८४.
वित्त विभाग,
मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२.

# CONTENTS


| Rule No. | Title | Page No. |
|---|---|---|
| | CHAPTER—I | |
| | **Preliminary** | |
| 1 | Short title and commencement .. .. .. .. | 1 |
| 2 | Extent of application.. .. .. .. .. | 1 |
| 3 | Definitions .. .. .. .. .. | 1 |
| | CHAPTER—II | |
| | **General Conditions** | |
| 4 | Restriction on commutation of pension .. .. .. | 3 |
| 5 | Limit on commutation of pension .. .. .. | 3 |
| 6 | Commutation of pension to become absolute .. .. | 3 |
| 7 | Death of an applicant before receiving the commuted value .. | 4 |
| 8 | Calculation of commuted value of pension and its non-restoration.. | 4 |
| 9 | Commutation of provisional pension .. .. .. | 4 |
| 10 | Restrospective revision of final pension .. .. .. | 5 |
| | CHAPTER—III | |
| | **Commutation of pension without medical examination** | |
| 11 | Scope .. .. .. .. .. | 7 |
| 12 | Eligibility .. .. .. .. .. | 7 |
| 13 | Application for commutation of pension .. .. .. | 8 |
| 14 | Action to be taken by the Head of Office on application for commutation of pension .. .. .. .. .. | 9 |
| 15 | Authorisation of commuted value by the Audit Officer .. | 9 |
| 16 | Authorisation of the commuted value of a fraction of provisional pension. | 11 |
| | CHAPTER—IV | |
| | **Commutation of pension after medical examination** | |
| 17 | Scope .. .. .. .. .. | 13 |
| 18 | Eligibility .. .. .. .. .. | 13 |
| 19 | Application for commutation of pension .. .. .. | 13 |
| 20 | Action to be taken by the Head of Office on application for commutation of pension .. .. .. .. | 14 |
| 21 | Action to be taken by medical authority .. .. .. | 15 |
| 22 | Medical authority .. .. .. .. .. | 15 |

# अनुक्रमणिका


| नियम क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **प्रकरण—एक** | |
| | **प्रारंभिक** | |
| १ | संक्षिप्त नाव व प्रारंभ .. .. .. .. | १ |
| २ | नियम लागू होण्याची व्याप्ती .. .. .. .. | १ |
| ३ | व्याख्या .. .. .. .. .. | १ |
| | **प्रकरण—दोन** | |
| | **सर्वसाधारण शर्ती** | |
| ४ | निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाबाबत निर्बंध .. .. .. | ३ |
| ५ | निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाबाबत मर्यादा .. .. .. | ३ |
| ६ | निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण कायम होणे .. .. .. | ३ |
| ७ | अंशराशीकृत मूल्य मिळण्यापूर्वी अर्जदाराचा मृत्यू .. .. | ४ |
| ८ | निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मूल्याची गणना व निवृत्तिवेतनाचा तो भाग पुन्हा न देणे. | ४ |
| ९ | तात्पुरत्या निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण .. .. .. | ४ |
| १० | अंतिम निवृत्तिवेतनाची भूतलक्षी सुधारणा .. .. .. | ५ |
| | **प्रकरण—तीन** | |
| | **वैद्यकीय तपासणीशिवाय निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण** | |
| ११ | व्याप्ती .. .. .. .. .. | ७ |
| १२ | पात्रता .. .. .. .. .. | ७ |
| १३ | निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणासाठी अर्ज .. .. .. | ८ |
| १४ | निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाच्या अर्जावर कार्यालय प्रमुखाने करावयाची कार्यवाही | ९ |
| १५ | लेखापरीक्षा अधिकाऱ्याने अंशराशीकृत मूल्य प्राधिकृत करणे .. .. | ९ |
| १६ | तात्पुरत्या निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकृत मूल्य प्राधिकृत करणे .. | ११ |
| | **प्रकरण—चार** | |
| | **वैद्यकीय तपासणीनंतर निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण** | |
| १७ | व्याप्ती .. .. .. .. .. | १३ |
| १८ | पात्रता .. .. .. .. .. | १३ |
| १९ | निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणासाठी अर्ज .. .. .. | १३ |
| २० | निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाच्या अर्जावर कार्यालय प्रमुखाने करावयाची कार्यवाही | १४ |
| २१ | वैद्यकीय प्राधिकाऱ्याने करावयाची कार्यवाही .. .. .. | १५ |
| २२ | वैद्यकीय प्राधिकारी .. .. .. .. | १५ |

CONTENTS


| Rule No. | Title | Page No. |
|---|---|---|
| | CHAPTER—IV—*contd.* | |
| 23 | Fee for medical examination to be borne by the applicant .. | 15 |
| 24 | Failure to appear before medical authority .. .. | 16 |
| 25 | Procedure for medical examination .. .. .. | 16 |
| 26 | Second medical examination .. .. .. .. | 17 |
| 27 | Appeal against the findings of medical authority .. .. | 18 |
| 28 | Withdrawal of application .. .. .. .. | 20 |
| 29 | Modification in the value specified in the Table .. .. | 21 |
| 30 | Authorisation of payment of commuted value by the Audit Officer | 21 |
| 31 | Final assessment of provisional pension .. .. .. | 22 |
| | CHAPTER—V | |
| | **Miscellaneous** | |
| 32 | Right to interpret .. .. .. .. .. | 23 |
| 33 | Power of relaxation .. .. .. .. .. | 23 |
| 34 | Repeal and Saving .. .. .. .. .. | 23 |

## अनुक्रमणिका


| नियम क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **प्रकरण—चार—चालू** | |
| २३ | अर्जदाराने वैद्यकीय तपासणीसाठी द्यावयाची फी .. .. .. | १५ |
| २४ | वैद्यकीय प्राधिकाऱ्यासमोर अनुपस्थिती .. .. | १६ |
| २५ | वैद्यकीय तपासणीकरिता कार्यपद्धती .. .. .. | १६ |
| २६ | दुसरी वैद्यकीय तपासणी .. .. .. .. | १७ |
| २७ | वैद्यकीय प्राधिकाऱ्याच्या निष्कर्षांविरुद्ध अपील .. .. .. | १८ |
| २८ | अर्ज मागे घेणे .. .. .. .. .. | २० |
| २९ | तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मूल्यांमध्ये फेरबदल .. .. | २१ |
| ३० | लेखापरीक्षा अधिकाऱ्याने अंशराशीकृत मूल्याचे प्रदान प्राधिकृत करणे .. | २१ |
| ३१ | तात्पुरत्या निवृत्तिवेतनाचे अंतिम निर्धारण .. .. .. | २२ |
| | **प्रकरण—पाच** | |
| | **संकीर्ण** | |
| ३२ | अर्थविवरण करण्याचा हक्क .. .. .. .. | २३ |
| ३३ | नियम शिथिल करण्याचा अधिकार .. .. .. | २३ |
| ३४ | निरसन आणि व्यावृत्ती .. .. .. .. | २३ |

CONTENTS


| Form | Title | Page No. |
|---|---|---|
| | **Forms and Table** | |
| A—Form of application for commutation of a fraction of pension without medical examination<br>[*See* rules 5 (2); 6 (1); 12; 13 (1) & (2); 14 (1) & (2); 15 (1) & (2) and 16 (1) & (2) ]. | | 24 |
| B—Form of application for commutation of a fraction of Superannuation Pension without medical examination when applicant desires that the payment of the commuted value of pension should be authorised at the time of issue of the Pension Payment Order<br>[*See* rules 5 (2); 12 ; 13 (3) ; 14 (1) and 15 (3)]. | | 27 |
| C—Form of application for commutation of pension after medical examination by an applicant referred to rule 18 of the Maharashtra Civil Services (Commutation of Pension) Rules, 1984.<br>[*See* rules 5(2); 9(3); 13(2); 14(2); 19; 20(1), (2) & (3); 21(1) and 25(2)]. | | 30 |
| D—Form of letter to the medical authority .. .. ..<br>[*See* rules 20 (3) & (4); 28 (5)] and 31 (2)] | | 34 |
| E—Form of medical examination by the medical authority ..<br>[*See* rules 6 (1); 20 (3); 25 (1), (2) & (3); 26 (3); 27 (1) & (3); 28 (2) and 30 (1)]. | | 37 |
| | TABLE | |
| | Commutation value for a pension of Rupee 1 per annum ..<br>[*See* rules 8(1); 26(7); 28(5) and 29(1) & (2)]. | 42 |
| | **Glossary** | |
| | English-Marathi and Marathi-English | 45 |

## अनुक्रमणिका


| नमुना | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **नमुने व तक्ता** | |
| ए— | वैद्यकीय तपासणीशिवाय निवृत्तिवेतनाच्या काही भागाच्या अंशराशीकरणासाठी अर्जाचा नमुना [नियम ५(२) ; ६(१) ; १२ ; १३(१) व (२) ; १४(१) व (२) ; १५(१) व (२) आणि १६(१) व (२) पहा).] | २४ |
| बी— | निवृत्तिवेतन प्रदान आदेश देताना निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मूल्याचे प्रदान प्राधिकृत करण्यात यावे अशी अर्जदाराची इच्छा असेल त्यावेळी, वैद्यकीय तपासणीशिवाय नियत वयमान निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण करण्यासाठी अर्जाचा नमुना [नियम ५(२) ; १२ ; १३(३) ; १४(१) आणि १५(३) पहा.] | २७ |
| सी— | महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ मधील नियम १८ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे वैद्यकीय तपासणीनंतर निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण करण्यासाठी अर्जाचा नमुना [नियम ५(२) ; ९(३) ; १३(२) ; १४(२) ; १९ ; २०(१), (२) व (३) ; २१(१) आणि २५(२) पहा.] | ३० |
| डी— | वैद्यकीय प्राधिकाऱ्याकडे पाठवावयाच्या पत्राचा नमुना .. .. [नियम २०(३) व (४) ; २८(५) आणि ३१(२) पहा.] | ३४ |
| ई— | वैद्यकीय प्राधिकाऱ्याने करावयाच्या वैद्यकीय तपासणीचा नमुना .. [नियम ६(१) ; २०(३) ; २५(१), (२) व (३) ; २६(३) ; २७(१) व (३) ; २८(२) आणि ३०(१) पहा.] | ३७ |
| | **तक्ता** | |
| | प्रतिवर्षी एक रुपया निवृत्तिवेतनाकरिता अंशराशीकरण मूल्य [नियम ८(१) ; २६(७) ; २८(५) आणि २९(१) व (२) पहा.] | ४२ |
| | **शब्दावली** | |
| | इंग्रजी-मराठी व मराठी-इंग्रजी | ४५ |

GOVERNMENT OF MAHARASHTRA

FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Bombay 400 032, dated the 19th July 1984

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA

No. MSC. 1084/9/SER-6.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following Rules, namely :—

## CHAPTER–I

## PRELIMINARY

### 1. Short title and commencement

(1) These rules may be called the Maharashtra Civil Services (Commutation of Pension) Rules, 1984.

(2) They shall come into force on the 15th day of August 1984.

### 2. Extent of application

These rules shall apply to Government servants who may be entitled to or have been authorised any class of service pension referred to in Chapter VII of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982.

### 3. Definitions

(1) In these rules, unless the context otherwise requires—

(*a*) " Audit Officer " means an Audit Officer, appointed by the Comptroller and Auditor General of India, whatever his official designation, in whose circle of audit, a public servant is serving or (in respect to verification of service) has served;

(*b*) " applicant " means a Government servant, including a retired Government servant, who applies for commutation of fraction of pension in the prescribed Form;

(*c*) " death-*cum*-retirement gratuity " means the gratuity payable under sub-rule (1) of rule 111 of the Maharashtra Civil Serivces (Pension) Rules, 1982;

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ जुलै १९८४

# अधिसूचना

**भारताचे संविधान**

क्रमांक एमएससी. १०८४/९/एसईआर-६.—भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३०९ याच्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल पुढील नियम करीत आहेत:—

## प्रकरण—एक

## प्रारंभिक

**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ**

(१) या नियमांस, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ असे म्हणावे.

(२) ते दिनांक १५ ऑगस्ट १९८४ पासून अंमलात येतील.*

**२. नियम लागू होण्याची व्याप्ती**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील प्रकरण—सातमध्ये निर्दिष्ट केलेले कोणत्याही प्रकारचे सेवा निवृत्तिवेतन मिळण्याचा ज्यांना हक्क असेल किंवा ते निवृत्तिवेतन मिळण्यास ज्यांना प्राधिकृत केलेले असेल अशा शासकीय कर्मचाऱ्यांना हे नियम लागू होतील.

**३. व्याख्या**

(१) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर—

(ए) "लेखापरीक्षा अधिकारी" म्हणजे, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी नियुक्त केलेला व ज्याच्या लेखापरीक्षा मंडलामध्ये शासकीय कर्मचारी सेवा करीत असेल अथवा त्याने (सेवेच्या पडताळणीच्या संबंधात) सेवा केली असेल असा लेखापरीक्षा अधिकारी, मग त्याचे अधिकृत पदनाम कोणतेही असो;

(बी) "अर्जदार" म्हणजे, निवृत्तिवेतनाच्या काही भागाच्या अंशराशीकरणासाठी विहित नमुन्यात अर्ज करणारा शासकीय कर्मचारी. या संज्ञेत सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचाही समावेश होतो;

(सी) "मृत्यु-नि-सेवानिवृत्ति उपदान" म्हणजे, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १११ चा पोटनियम (१) यानुसार देय असलेले उपदान;

(*d*) " disbursing authority " means—

(*i*) branch of a Nationalised Bank, or

(*ii*) treasury including sub-treasury,

from where the applicant is receiving pension authorised under the Pension Rules;

(*e*) " Form " means a Form appended to these rules;

(*f*) " Head of Office " means a Gazetted Officer declared as such by Government and includes such other authority or person whom the competent authority may, by order, specify as Head of Office;

(*g*) " medical authority " means medical authority referred to in rule 22;

(*h*) " pension " means any class of service pension including Compassionate Pension referred to in Chapter-VII of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982, but does not include extra pension and the amount, by whatever name called, granted by the Government to a pensioner as compensation for higher cost of living;

(*i*) " Pension Rules " means the pension rules contained in Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982;

(*j*) " provisional pension " means the pension referred to in rule 126 of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982;

(*k*) " Table " means a Table appended to these rules.

(2) The words and expressions used in these rules but not defined shall have the meaning respectively assigned to them in Chapter-II of the Maharashtra Civil Services (General Conditions of Services) Rules, 1981.

(डी) "संवितरण प्राधिकरण" म्हणजे, निवृत्तिवेतन नियमांखाली प्राधिकृत केलेले निवृत्तिवतन अर्जदार जेथून घेत असेल —

(एक) अशी राष्ट्रीयीकृत बँकेची शाखा, किंवा

(दोन) असे कोषागार व उपकोषागार;

(ई) "नमुना" म्हणजे, या नियमांना जोडलेला नमुना;

(एफ) "कार्यालय प्रमुख" म्हणजे, शासनाने राजपत्रित अधिकारी म्हणून घोषित केलेला अधिकारी आणि सक्षम प्राधिकाऱ्याने आदेशाद्वारे 'कार्यालय प्रमुख' म्हणून विनिर्दिष्ट केलेला असा अन्य प्राधिकारी किंवा व्यक्ती यांचा त्यात समावेश होतो;

(जी) "वैद्यकीय प्राधिकारी" म्हणजे, नियम २२ मध्ये निर्दिष्ट केलेला वैद्यकीय प्राधिकारी;

(एच) "निवृत्तिवेतन" म्हणजे, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील प्रकरण–सात मध्ये निर्दिष्ट कलेल्या अनुकंपा निवृत्तिवेतनासह कोणत्याही प्रकारचे सेवा निवृत्तिवेतन. परंतु जादा निवृत्तिवेतन व जीवनमानाचा दर्जा उंचावल्यामुळे निवृत्तिवेतनधारकाला शासनाकडून दण्यात येणारी भरपाईची रक्कम यांचा त्यात अंतर्भाव होत नाही, मग अशा रकमेला कोणत्याही नावाने संबोधलेले असो;

(आय) "निवृत्तिवेतन नियम" म्हणजे, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ यामध्ये अंतर्भूत असलेले निवृत्तिवेतनविषयक नियम;

(जे) "तात्पुरते निवृत्तिवेतन" म्हणजे, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १२६ मध्ये निर्दिष्ट केलेल निवृत्तिवतन;

(के) "तक्ता" म्हणजे, या नियमांना जोडलेला तक्ता.

(२) या नियमांमध्ये वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, महाराष्ट्र नागरी सेवा (सेवच्या सर्वसाधारण शर्ती) नियम,* १९८१ मधील प्रकरण–दोनमध्ये, जो अर्थ नमून दिलेला आहे तोच अर्थ असेल.

# CHAPTER–II

## GENERAL CONDITIONS

**4. Restriction on commutation of pension**

No Government servant, against whom departmental or judicial proceedings have been instituted before the date of his retirement, or the pensioner against whom such proceedings are instituted after the date of his retirement, shall be eligible to commute a fraction of his provisional pension authorised or the pension, as the case may be during the pendency of such proceedings.

**5. Limit on commutation of pension**

(1) A Government servant shall be entitled to commute for a lump sum payment a fraction not exceeding **one-third** of his pension.

(2) In an application for commutation in Form-A or Form-B or Form-C, as the case may be, an applicant shall indicate the fraction of pension which he desires to commute and may either indicate the maximum limit of **one-third** of pension or such lower limit as he may desire to commute.

(3) If fraction of pension to be commuted results in fraction of rupee, such fraction of a rupee shall be ignored for the purpose of commutation.

**6. Commutation of pension to become absolute**

(1) The commutation of pension shall become absolute in the case of an applicant referred to—

(*i*) in sub-rule (1) of rule 13, on the date on which the application in Form-A is received by the Head of Office;

(*ii*) in sub-rule (3) of rule 13, on the date following the date of his retirement ;

(*iii*) in Chapter-IV of these rules, on the date on which the medical authority signs the medical report in Part-III of Form-E :

# प्रकरण–दोन

## सर्वसाधारण शर्ती

### ४. निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाबाबत निर्बंध

सेवानिवृत्त होण्याच्या तारखेपूर्वी ज्याच्याविरुद्ध विभागीय अथवा न्यायिक कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे असा कोणताही शासकीय कर्मचारी किंवा ज्याच्याविरुद्ध सेवानिवृत्तीनंतर अशी कार्यवाही सुरू करण्यात आली आहे असा कोणताही निवृत्तिवेतनधारक, अशी कार्यवाही प्रलंबित असतानाच्या कालावधीत, प्राधिकृत केलेल्या तात्पुरत्या निवृत्तिवेतनाच्या भागाचे किंवा यथास्थिति, निवृत्तिवेतनाच्या भागाचे अंशराशीकरण करण्यास पात्र असणार नाही.

### ५. निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाबाबत मर्यादा

(१) शासकीय कर्मचाऱ्याला, त्याच्या निवृत्तिवेतनाच्या **एक-तृतीयांश** यापेक्षा अधिक होणार नाही एवढ्या भागाचे, एका ठोक रकमेतील प्रदानासाठी, अंशराशीकरण करण्याचा हक्क असेल.

(२) अर्जदार **नमुना "ए"** किंवा **नमुना "बी"**, किंवा यथास्थिति, **नमुना "सी"** मधील अंशराशीकरणाच्या अर्जामध्ये निवृत्तिवेतनाच्या किती भागाचे तो अंशराशीकरण करू इच्छितो ते नमूद करील आणि त्याला, निवृत्तिवेतनाची **एक-तृतीयांश** ही कमाल मर्यादा किंवा त्याहून कमी अशा ज्या मर्यादेपर्यंत निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण तो करू इच्छित असेल ती मर्यादा, नमूद करता येईल.

(३) अंशराशीकरण करावयाच्या निवृत्तिवेतनाच्या रकमेत शेवटी रुपया अपूर्णांकात येत असेल तर असा अपूर्णांकित रुपया अंशराशीकरणाच्या प्रयोजनासाठी हिशेबात घेतला जाणार नाही.

### ६. निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण कायम होणे

(१) निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण खालील तारखांना कायम होईल :—

(एक) नियम १३ मधील पोटनियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अर्जदाराच्या बाबतीत, ज्या तारखेस **नमुना "ए"** मधील अर्ज कार्यालय प्रमुखाला मिळेल त्या तारखेस;

(दोन) नियम १३ च्या पोटनियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अर्जदाराच्या बाबतीत, त्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेनंतरच्या तारखेस;

(तीन) या नियमांच्या प्रकरण—चारमध्ये निर्दिष्ट केलेल्या अर्जदाराच्या बाबतीत, ज्या तारखेस वैद्यकीय प्राधिकारी **नमुना "ई"** च्या भाग–तीनमधील वैद्यकीय अहवालावर सही करील त्या तारखेस :

Provided that—

(*a*) in the case of an applicant who is drawing his pension from a Treasury, the reduction in the amount of pension on account of commutation shall be operative from the date of receipt of the commuted value of pension or at the end of **three months** after issue of authority by the Audit Officer for the payment of commuted value of pension, whichever is earlier, and

(*b*) in the case of an applicant who is drawing pension from a branch of a Nationalised Bank, the reduction in the amount of pension on account of commutation shall be operative from the date on which the commuted value of pension is credited by the Bank to the applicant's account to which pension is being credited.

(2) In the case of an applicant referred to in rule 9 or rule 10 the commuted value is paid in two stages. The reduction in the amount of pension shall be made from the respective dates of the payments as laid down in clause (*a*) or clause (*b*) of the proviso to sub-rule (1).

(3) The date on which the payment of the commuted value of pension was made to the applicant or the commuted value was credited to the applicant's account, shall be entered in both halves of the Pension Payment Order by the disbursing authority under intimation to the Audit Officer who authorised the payment of commuted value of pension.

**7. Death of an applicant before receiving the commuted value**

If an applicant dies without receiving the commuted value on or after the date on which commutation became absolute, the commuted value shall be paid to his heirs.

**8. Calculation of commuted value of pension and its non-restoration**

(1) The lump sum payable to an applicant shall be calculated in accordance with the Table of the values prescribed from time to time and applicable to the applicant on the date on which the commutation becomes absolute.

(2) A commutation once applied for and given effect to cannot be rescinded, i.e. the portion of a pension commuted cannot be restored on refund of its capitalised value.

**9. Commutation of provisional pension**

(1) A Government servant to whom, pending assessment of final pension, provisional pension has been sanctioned under rule 126 of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982, shall be eligible to commute a fraction of such provisional pension subject to the limit specified in rule 5.

मात्र असे की—

(ए) कोषागारामधून निवृत्तिवेतन घेणाऱ्या अर्जदाराच्या बाबतीत, निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य त्याला ज्या तारखेस मिळेल ती तारीख किंवा लेखापरीक्षा अधिकाऱ्याने निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य प्रदान करण्यासाठी प्राधिकारपत्र दिल्यानंतर **तीन महिन्यांच्या** अखेरची तारीख, यांपैकी जी तारीख अगोदरची असेल त्या तारखेपासून अंशराशीकरणामुळे निवृत्तिवेतनाची रक्कम कमी करण्यात येईल, आणि

(बी) राष्ट्रीयीकृत बँकेच्या शाखेमधून निवृत्तिवेतन घेणाऱ्या अर्जदाराच्या बाबतीत, अर्जदाराच्या ज्या खात्यावर निवृत्तिवेतनाची रक्कम जमा केली जाते त्या खात्यावर बँकेने ज्या तारखेला निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य जमा केले असेल, त्या तारखेपासून अंशराशीकरणामुळे निवृत्तिवेतनाची रक्कम कमी करण्यात येईल.

(२) नियम ९ किंवा १० मध्ये निर्दिष्ट केलेल्या अर्जदाराच्या बाबतीत, अंशराशीकृत मूल्य दोन टप्प्यांत देण्यात येते. पोट-नियम (१) च्या परंतुकाच्या खंड (ए) किंवा खंड (बी) मध्ये विहित केलेल्या प्रदानांच्या संबंधित तारखांपासून निवृत्तिवेतनाची रक्कम कमी करण्यात येईल.

(३) निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य ज्या तारखेस अर्जदाराला प्रदान करण्यात आले किंवा अंशराशीकृत मूल्य अर्जदाराच्या खात्यावर ज्या तारखेस जमा करण्यात आले ती तारीख संवितरण प्राधिकरण निवृत्तिवेतन प्रदान आदेशाच्या दोन्ही भागांत नमूद करील आणि निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य प्राधिकृत करणाऱ्या लेखापरीक्षा अधिकाऱ्याला तसे कळवील.

### ७. अंशराशीकृत मूल्य मिळण्यापूर्वी अर्जदाराचा मृत्यू

निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य ज्या तारखेस कायम होते त्या तारखेस किंवा त्यानंतर अंशराशीकृत मूल्य मिळण्यापूर्वी अर्जदाराचा मृत्यू झाल्यास, त्या मूल्याची रक्कम त्याच्या वारसांना देण्यात येईल.

### ८. निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मूल्याची गणना व निवृत्तिवेतनाचा तो भाग पुन्हा न देणे

(१) अर्जदारास देय होणाऱ्या ठोक रकमेची गणना वेळोवेळी विहित केलेल्या आणि अंशराशीकरण कायम होईल त्या तारखेस अर्जदारास लागू असलेल्या मूल्यांच्या तक्त्यानुसार करण्यात येईल.

(२) अंशराशीकरणासाठी एकदा अर्ज केल्यावर आणि अंशराशीकृत मूल्य मिळाल्यावर अंशराशीकरण रद्द करता येणार नाही. म्हणजेच निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत भागाची ठोक रक्कम परत केली गेल्यावरसुद्धा तो भाग पुन्हा दिला जाणार नाही.

### ९. तात्पुरत्या निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण

(१) अंतिम निवृत्तिवेतन निर्धारित होईपर्यंत, ज्या शासकीय कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १२६ अन्वये तात्पुरते निवृत्तिवेतन मंजूर करण्यात आले असेल तो कर्मचारी, नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेच्या अधीन राहून, अशा तात्पुरत्या निवृत्तिवेतनापैकी काही भागाचे अंशराशीकरण करण्यास पात्र होईल.

(2) For the purpose of commutation of provisional pension, the provisions of Chapter-III or Chapter-IV of these rules, as the case may be, shall apply.

(3) The provisions of this sub-rule shall apply to an applicant who for the purpose of commutation of provisional pension is governed by Chapter-IV of these rules—

(*a*) Where an applicant desires to commute a fraction of his provisional pension which works out to be not exceeding *one hundred rupees* per mensem and in whose case it is expected that the amount which he would be entitled to commute when the final amount of pension has been authorised, would exceed *one hundred rupees* per mensem, his application shall be deemed, for the purpose of rule 22, to be for commutation of amount exceeding *one hundred rupees* per mensem.

(*b*) (*i*) Where the applicant does not indicate the possibility of his entitlement to commutation of pension exceeding *one hundred rupees* per mensem on the determination of final pension due to him, he shall be treated as having applied for commutation of pension not exceeding *one hundred rupees* per mensem.

(*ii*) If on the determination of final pension, the applicant becomes entitled to commute his pension upto *one hundred rupees* per mensem, he shall not be required to undergo medical examination for payment to him of the difference between the commuted value of the pension originally commuted and the pension commuted subsequently.

(*iii*) If on the determination of final pension, the applicant becomes entitled to commute a sum exceeding *one hundred rupees*, he shall, for commutation of pension exceeding *rupees one hundred*, be required to apply afresh in Form-C.

**10. Retrospective revision of final pension**

An applicant who has commuted a fraction of his final pension and after commutation his pension has been revised and enhanced retrospectively, as a result of Government's decision, the applicant shall be paid the difference between the commuted value determined with reference to enhanced pension and the commuted value already authorised. For the payment of difference, the applicant shall not be required to apply afresh:

(२) तात्पुरत्या निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाच्या प्रयोजनासाठी, या नियमांच्या प्रकरण–तीन किंवा यथास्थिति, प्रकरण–चार मधील तरतुदी लागू होतील.

(३) तात्पुरत्या निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाच्या प्रयोजनासाठी या नियमांच्या प्रकरण–चार खाली येणाऱ्या अर्जदाराला, या पोटनियमाच्या तरतुदी लागू होतील.

(ए) ज्यावेळी एखाद्या अर्जदाराची आपल्या तात्पुरत्या निवृत्तिवेतनापैकी दरमहा शंभर रुपयांहून अधिक नाही इतक्या भागाचे अंशराशीकरण करण्याची इच्छा असेल आणि त्याला निवृत्तिवेतनाची अंतिम रक्कम प्राधिकृत करण्यात आल्या-नंतर, जेवढ्या रकमेचे अंशराशीकरण करण्यास तो हक्कदार होईल तेवढी रक्कम, दरमहा शंभर रुपयांहून अधिक होईल असे अपेक्षित असेल त्यावेळी त्याचा अर्ज, नियम २२ च्या प्रयोजनासाठी, दरमहा शंभर रुपयांहून अधिक इतक्या रकमेचे अंशराशीकरण करण्यासाठी केलेला आहे असे मानण्यात येईल.

(बी) (एक) अर्जदाराने, त्याला देय असलेले अंतिम निवृत्तिवेतन निर्धारित झाल्यानंतर त्यापैकी दरमहा शंभर रुपयांहून अधिक इतक्या रकमेचे अंशराशीकरण मिळण्यास तो हक्कदार होण्याची शक्यता आहे असे सूचित केले नसेल तेव्हा, त्याने दरमहा शंभर रुपयांहून अधिक नाही इतक्या निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणा-साठी अर्ज केला आहे असे मानण्यात येईल.

(दोन) अर्जदाराचे अंतिम निवृत्तिवेतन निर्धारित झाल्यानंतर तो त्यापैकी दरमहा शंभर रुपयांपर्यंतच्या रकमेचे अंशराशीकरण करण्यास हक्कदार होत असल तर, निवृत्तिवेतनाचे प्रारंभिक अंशराशीकृत मूल्य आणि नंतरचे अंश-राशीकृत मूल्य यांमधील फरकाच्या प्रदानासाठी त्याची वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक असणार नाही.

(तीन) अर्जदाराचे अंतिम निवृत्तिवेतन निर्धारित झाल्यानंतर तो त्यापैकी दरमहा शंभर रुपयांपेक्षा जास्त रकमेचे अंशराशीकरण करण्यास हक्कदार होत असेल तर त्याने शंभर रुपयांपेक्षा जास्त निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण करण्यासाठी **नमुना "सी"** मध्ये नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे.

## १०. अंतिम निवृत्तिवेतनाची भूतलक्षी सुधारणा

एखाद्या अर्जदाराने आपल्या अंतिम निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण केले असेल आणि त्यानंतर शासकीय निर्णयामुळे त्याच्या निवृत्तिवेतनात भूतलक्षी सुधारणा व वाढ झाली असेल तर, अशा वाढीव निवृत्तिवेतनाच्या संदर्भात निर्धारित केलेले अंशराशीकृत मूल्य आणि अगोदरच प्राधिकृत केलेले अंशराशीकृत मूल्य यांमधील फरकाची रक्कम अर्जदाराला प्रदान करण्यात येईल. या रकमेच्या प्रदानासाठी अर्जदाराने नव्याने अर्ज करणे आवश्यक असणार नाही :

Provided that in the case of an applicant who has commuted a fraction of his original pension not exceeding *rupees one hundred* after being declared fit by a Civil Surgeon or a District Medical Officer and as a result of retrospective enhancement of pension, he becomes eligible to commute an amount exceeding *one hundred rupees* per mensem, he shall be allowed the difference between the commuted value of *one hundred rupees* per mensem and the commuted value of the fraction of the original pension without further medical examination. The commutation of any further amount beyond *rupees one hundred* per mensem shall be treated as fresh commutation and allowed subject to examination by a Medical Board.

मात्र, जिल्हा शल्यचिकित्सकाने किंवा जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्याने अर्जदाराला शारीरिकदृष्टया पात्र ठरविल्यानंतर त्याने आपल्या मूळ निवृत्तिवेतनापैकी शंभर रुपयांहून अधिक नसलेल्या भागाचे अंशराशीकरण केलेले असेल आणि निवृत्तिवेतनातील भूतलक्षी वाढीचा परिणाम म्हणून दरमहा शंभर रुपयांहून अधिक रकमेचे अंशराशीकरण करण्यास तो पात्र ठरत असेल तर, दरमहा शंभर रुपयांचे अंशराशीकृत मूल्य आणि मूळ निवृत्तिवेतनाच्या भागाचे अंशराशीकृत मूल्य यांतील फरकाची रक्कम त्याला पुन्हा वैद्यकीय तपासणी केल्याशिवाय दिली जाईल. दरमहा शंभर रुपयांहून अधिक असलेल्या कोणत्याही रकमेचे अंशराशीकरण हे नवीन अंशराशीकरण असल्याचे मानण्यात येईल आणि ते वैद्यकीय मंडळाकडून तपासणी झाल्यानंतरच दिले जाईल.

# CHAPTER – III

## COMMUTATION OF PENSION WITHOUT MEDICAL EXAMINATION

### 11. Scope

The provisions of this Chapter shall apply to an applicant who is eligible to commute a fraction of his pension without medical examination.

### 12. Eligibility

An applicant who is authorised —

(*i*) Superannuation Pension under rule 63 of Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982; or

(*ii*) a Retiring Pension under rule 64 or rule 65 or 66 of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982; or

(*iii*) a pension on absorption in or under a Corporation, Autonomous Body or a Local Authority in terms of rule 67 of Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 and who elects to receive monthly pension and death-*cum*-retirement gratuity; or

(*iv*) a Compensation Pension on abolition of permanent post under rule 81 of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982; or

(*v*) a pension in whole or in part on the finalisation of the departmental or judicial proceedings and issue of final orders thereon

shall, subject to the limit in rule 5, be eligible to commute a fraction of his pension without medical examination:

Provided that he applies for commutation of pension in Form-A or Form-B in accordance with the provisions of rule 13.

*Note*.—Pension referred to in clause (*i*), clause (*ii*) and clause (*iv*) shall include the provisional pension sanctioned under rule 126 of Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982.

## प्रकरण--तीन

## वैद्यकीय तपासणीशिवाय निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण

### ११. व्याप्ती

निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण वैद्यकीय तपासणीशिवाय करण्यास पात्र असलेल्या अर्जदाराला या प्रकरणातील तरतुदी लागू होतील.

### १२. पात्रता

खालील अर्जदार, नियम ५ मधील मर्यादेच्या अधीन राहून, वैद्यकीय तपासणीशिवाय त्याच्या निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण करण्यास पात्र होईल :—

(एक) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६३ अन्वये नियत वयमान निवृत्तिवेतन प्राधिकृत केलेला अर्जदार, किंवा

(दोन) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६४ किंवा नियम ६५ किंवा ६६ अन्वये पूर्णसेवा निवृत्तिवेतन प्राधिकृत केलेला अर्जदार, किंवा

(तीन) महामंडळ, स्वायत्त संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण यामध्ये किंवा याखाली सामावून घेतल्यावर, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६७ अन्वये मिळणारे निवृत्तिवेतन प्राधिकृत केलेला आणि मासिक निवृत्तिवेतन व मृत्यु-नि-सेवानिवृत्ति उपदान मिळण्याचा पर्याय निवडणारा अर्जदार, किंवा

(चार) स्थायी पद नाहीसे झाल्यावर, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ८१ अन्वये भरपाई निवृत्तिवेतन प्राधिकृत केलेला अजदार, किंवा

(पाच) विभागीय किंवा न्यायिक कार्यवाही अंतिम स्वरूपात पूर्ण झाल्यावर आणि त्याबाबतचा अंतिम आदश निर्गमित झाल्यावर पूर्णतः किंवा अंशतः निवृत्तिवेतन प्राधिकृत केलेला अर्जदार :

मात्र, नियम १३ मधील तरतुदींनुसार, **नमुना "ए"** किंवा **नमुना "बी"** मध्ये अर्जदाराने निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणासाठी अर्ज करावयास पाहिजे.

**टीप.—**खंड (एक), खंड (दोन) आणि खंड (चार) मध्ये नमूद केलेल्या निवृत्तिवेतनामध्ये, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १२६ अन्वये मंजूर केलेल्या तात्पुरत्या निवृत्ति-वेतनाचा अंतर्भाव होतो.

**13. Application for commutation of pension**

(1) An applicant, who is in receipt of any pension referred to in rule 12 and desires to commute a fraction of that pension any time after the date following the date of his retirement from service but before the expiry of **one year** from the date of retirement, shall—

(*a*) apply to the Head of Office in Form-A after the date of his retirement;

(*b*) ensure that the application in Form-A, duly completed, is delivered to the Head of Office as early as possible but not later than **one year** of the date of his retirement:

Provided that in the case of an applicant—

(i) referred to in clause (*iii*) of rule 12, where order retiring him from Government service had been issued from a retrospective date, the period of **one year** referred to in this sub-rule shall reckon from the date of issue of the retirement orders;

(ii) referred to in clause (*v*) of rule 12, the period of **one year** referred to in this sub-rule shall reckon from the date of the issue of the orders consequent on the finalisation of the departmental or judicial proceedings.

(2) An applicant who applies for commutation of pension within **one year** of the date of his retirement but his application in Form-A is received by the Head of Office after **one year** of the date of his retirement, shall not be eligible to get his pension commuted without medical examination. Such an applicant, if he desires to commute a fraction of his pension, shall apply afresh in Form-C in accordance with the procedure laid down in Chapter-IV.

(3) A Government servant who is due to retire on superannuation and desires payment of the commuted value of pension being authorised at the time of issue of the Pension Payment Order, shall be eligible to apply for commutation of a fraction of pension alongwith pension papers prior to the date of retirment :

Provided that—

(*a*) the Government servant retires on Superannuation Pension only ;

(*b*) the application is submitted to the Head of Office in Form-B so as to reach the Head of Office not later than **three months** before the date of superannuation :

## १३. निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणासाठी अर्ज

(१) नियम १२ मध्ये निर्दिष्ट केलेले कोणतेही निवृत्तिवेतन ज्याला मिळत आहे आणि सेवेतून निवृत्त झाल्याच्या तारखेनंतर केव्हाही परंतु सेवानिवृत्तीच्या तारखेपासून **एक वर्षाच्या आत**, त्या निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण करण्याची ज्याची इच्छा आहे अशा अर्जदाराने—

(ए) त्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेनंतर **नमुना "ए"** मध्ये कार्यालय प्रमुखाकडे अर्ज केला पाहिजे;

(बी) यथोचितरीत्या पूर्ण केलेला **नमुना "ए"** मधील अर्ज, शक्य तितक्या लवकर, परंतु सेवानिवृत्तीच्या तारखेपासून **एक वर्षाच्या आत**, कार्यालय प्रमुखाला मिळाल्याची खात्री करून घतली पाहिजे :

मात्र,—

(एक) नियम १२ मधील खंड (तीन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अर्जदाराच्या बाबतीत, त्याला शासनाच्या सेवेतून निवृत्त करण्यासंबंधीचा आदेश भूतलक्षी तारखेपासून काढण्यात आला असेल तेव्हा, या पोटनियमांमध्ये निर्दिष्ट केलेला **एक वर्षाचा कालावधी**, सेवानिवृत्तीचा आदेश काढण्यात आल्याच्या तारखेपासून मोजण्यांत येईल;

(दोन) नियम १२ मधील खंड (पाच) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अर्जदाराच्यां बाबतीत, या पोटनियमात निर्दिष्ट केलेला **एक वर्षाचा कालावधी**, विभागीय चौकशी किंवा न्यायिक कार्यवाही संपल्यानंतर काढण्यात आलेल्या आदेशाच्या तारखेपासून मोजण्यात येईल.

(२) अर्जदाराने त्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपासून **एक वर्षाच्या आत** निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण करण्यासाठी अर्ज केला असेल, परंतु त्याचा **नमुना "ए"** मधील अर्ज त्याच्या निवृत्तीच्या तारखेनंतर **एक वर्ष** पूर्ण झाल्यानंतर कार्यालय प्रमुखाला मिळाला असेल तर, त्याची वैद्यकीय तपासणी झाल्याशिवाय तो निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण करण्यास पात्र होणार नाही. असा अर्जदार त्याच्या निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण करू इच्छित असेल तर, प्रकरण—चारमध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार त्याने **नमुना "सी"** मध्ये नव्याने अर्ज केला पाहिजे.

(३) जो नियत वयमानावर निवृत्त होणार आहे व निवृत्तिवेतन प्रदान आदेश निर्गमित करतेवेळी निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मूल्याचे प्रदान प्राधिकृत व्हावे असे इच्छितो असा शासकीय कर्मचारी, सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वी, निवृत्तिवेतनविषयक कागदपत्रांबरोबर निवृत्तिवेतनाच्या काही भागाच्या अंशराशीकरणासाठी अर्ज करण्यास पात्र असेल :

मात्र,—

(ए) शासकीय कर्मचारी फक्त नियत वयमान निवृत्तिवेतनावर निवृत्त झालेला असला पाहिजे;

(बी) नियत वयमानाच्या तारखेच्या कमीत कमी **तीन महिने** अगोदर अर्ज पोहोचल अशा रीतीने तो अर्ज **नमुना "बी"** मध्ये कार्यालय प्रमुखाला सादर करण्यात आला पाहिजे;

(*c*) no such application referred to in clause (b) shall be entertained if the period is less than **three months** from the date of superannuation of the Government servant under intimation to him ; and

(*d*) the Government shall have no liability for the payment of the commuted value of pension if the Government servant dies before the date of superannuation or forfeits claim to pension before retirement.

### 14. Action to be taken by the Head of Office on application for commutation of pension

(1) The Head of Office on receipt of application in Form-A under sub-rule (1) or in Form-B of sub-rule (3) of rule 13 shall—

(*a*) initial the Form indicating the date of its receipt;

(*b*) acknowledge immediately the receipt of Form-A or Form-B in Part II of that Form and despatch the same to the applicant ;

(*c*) take immediate action to complete Part-III of Form-A or Form-B and forward the same to the Audit Officer after retaining one copy for his record.

(2) In case application in Form-A is received by the Head of Office under sub-rule (1) of rule 13 after **one year** of the date of retirement of the applicant, the Head of Office shall inform the applicant that—

(*a*) he shall not be eligible to commute a fraction of pension without medical examination;

(*b*) if he desires to get a fraction of the pension commuted, he should apply afresh in Form-C so that arrangements for medical examination are made in accordance with the procedure laid down in Chapter-IV.

### 15. Authorisation of commuted value by the Audit Officer

(1) The Audit Officer on receipt of Form-A from the Head of Office shall verify that—

(*a*) information furnished by the Head of Office in Part-III of Form-A is correct;

(*b*) the applicant is eligible to commute a fraction of his pension without medical examination;

(*c*) the commuted value of pension has been determined correctly by the Head of Office.

(सी) खंड (बी) मध्ये निर्दिष्ट केलेला अशा प्रकारचा अर्ज जर शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्या नियत वयमानाच्या तारखेपूर्वी **तीन महिन्यांच्या** आत केलेला असेल तर, तो अर्ज स्वीकारण्यात येणार नाही व त्याला तसे कळविण्यात येईल; आणि

(डी) शासकीय कर्मचारी नियत वयमानाच्या तारखेपूर्वी मृत्यू पावला किंवा त्याने निवृत्तिवेतन मिळण्याचा हक्क सेवानिवृत्तीपूर्वी गमावला तर, निवृत्तिवेतनाच अंशराशीकृत मूल्य प्रदान करण्याचे कोणतेही दायित्व शासनावर असणार नाही.

## १४. निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाच्या अर्जावर कार्यालय प्रमुखाने करावयाची कार्यवाही

(१) नियम १३ मधील पोटनियम (१) अनुसार **नमुना "ए"** किंवा पोटनियम (३) अनुसार **नमुना "बी"** मधील अर्ज कार्यालय प्रमुखास मिळाल्यानंतर त्याने—

(ए) नमुन्यावर आद्याक्षरी करून अर्ज मिळाल्याची तारीख नमूद करावी;

(बी) **नमुना "ए"** किंवा **नमुना "बी"** मिळाल्याची पोच त्या नमुन्याच्या भाग–दोनमध्ये तावडतोब द्यावी आणि ती अर्जदाराकडे पाठवावी;

(सी) **नमुना "ए"** किंवा **नमुना "बी"** मधील भाग–तीन पूर्ण करावा आणि एक प्रत अभिलेखादाखल स्वतःकडे ठेवून तो नमुना लेखापरीक्षा अधिकाऱ्याकडे पाठवावा.

(२) नियम १३ मधील पोटनियम (१) अनुसार **नमुना "ए"** मधील अर्ज, अर्जदाराच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपासून **एक वर्षानंतर** कार्यालय प्रमुखाकडे आल्यास कार्यालय प्रमुखाने असे अर्जदारास कळवावे की,—

(ए) वैद्यकीय तपासणीशिवाय निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण करण्यास अर्जदार पात्र ठरणार नाही;

(बी) निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण करण्याची अर्जदाराची, इच्छा असल्यास, प्रकरण–चारमध्ये विहित केलेल्या कायपद्धतीनुसार वैद्यकीय तपासणी करण्याची व्यवस्था करता यावी म्हणून, त्याने **नमुना "सी"** मध्ये नव्याने अर्ज करावा.

## १५. लेखापरीक्षा अधिकाऱ्याने अंशराशीकृत मूल्य प्राधिकृत करणे

(१) कार्यालय प्रमुखाकडून लेखापरीक्षा अधिकाऱ्याला **नमुना "ए"** मिळाल्यानंतर त्याने खालील बाबी पडताळून पहाव्यात :—

(ए) **नमुना "ए"** च्या भाग–तीन मध्ये कार्यालय प्रमुखाने दिलेली माहिती बरोबर आहे;

(बी) अर्जदार वैद्यकीय तपासणीशिवाय त्याच्या निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण करण्यास पात्र आहे;

(सी) कार्यालय प्रमुखाने निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य बरोबर निर्धारित केलेले आहे.

(2) The Audit Officer after necessary verification of the information furnished in Form-A shall—

(*a*) issue authority for the payment of commuted value of pension to the disbursing authority concerned;

(*b*) draw the attention of the disbursing authority concerned to the proviso to sub-rule (1) of rule 6 so that the disbursing authority may make entry in the Pension Payment Order regarding the date on which the amount of pension is to be reduced on account of commuted part of pension;

(*c*) endorse to the applicant a copy of the authority referred to in clause (*a*) with the instructions that he should collect the commuted value of pension from the disbursing authority.

(3) (*a*) The Audit Officer, on receipt of Form-B from the Head of Office, shall ascertain and verify if the amount of Superannuation Pension of the applicant has been calculated and if not, take steps to finalise the amount of pension so that the Pension Payment Order is issued before **one month** of the date of retirement of the applicant.

(*b*) (*i*) The Audit Officer, after necessary verification of the information furnished in Form-B, shall specify in both halves of the Pension Payment Order—

(A) the amount of pension commuted ;

(B) the commuted value of the amount of pension commuted ;

(C) the date from which the commuted value becomes payable.

(*ii*) The Audit Officer shall intimate to the applicant the date on which the Pension Payment Order has been despatched to the disbursing authority with the instruction that the applicant should collect the commuted value from that authority.

(*iii*) The Audit Officer, while forwarding the Pension Payment Order to the disbursing authority concerned, shall draw attention of the said authority to the proviso to sub-rule (1) of rule 6 so that the disbursing authority may make an entry in the Pension Payment Order regarding the date on which the amount of pension is to be reduced on account of commuted portion of pension.

(*iv*) The Audit Officer shall also request the disbursing authority to intimate the date on which the payment of the commuted value has been made to the applicant.

(२) **नमुना "ए"** मध्ये दिलेल्या माहितीची आवश्यक ती पडताळणी केल्यानंतर लेखापरीक्षा अधिकारी—

(ए) संबंधित संवितरण प्राधिकरणास निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मूल्याच्या प्रदानासाठी प्राधिकारपत्र पाठवील;

(बी) निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण केल्यामुळे निवृत्तिवेतनाची रक्कम ज्या तारखेस कमी करावयाची त्या तारखेबाबतची नोंद निवृत्तिवेतन प्रदान आदेशामध्ये संबंधित संवितरण प्राधिकरणाला करता यावी यासाठी, नियम ६ मधील पोटनियम (१) च्या परंतुकाकडे त्याचे लक्ष वेधील;

(सी) खंड (ए) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्राधिकारपत्राची प्रत अर्जदाराकडे पाठवून निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य त्याने संवितरण प्राधिकरणाकडून घ्यावे अशी सूचना देईल.

(३) (ए) कार्यालय प्रमुखाकडून **नमुना "बी"** मिळाल्यानंतर, लेखापरीक्षा अधिकारी, अर्जदाराच्या नियत वयमान निवृत्तिवेतनाची गणना केली आहे किंवा कसे याबाबत खात्री करून घेईल व त्याची पडताळणी करील आणि अशी गणना करण्यात आली नसेल तर, अर्जदाराच्या सेवानिवृत्तीच्या तारखेच्या **एक महिना** अगोदर निवृत्तिवेतन प्रदान आदेश काढता यावा म्हणून निवृत्तिवेतनाची रक्कम अंतिमरीत्या निश्चित करण्याची कार्यवाही करील.

(बी) (एक) **नमुना "बी"** मध्ये दिलेल्या माहितीची आवश्यक ती पडताळणी केल्यानंतर निवृत्तिवेतन प्रदान आदेशाच्या दोन्ही अर्धभागांमध्ये लेखापरीक्षा अधिकारी खालील बाबी विनिर्दिष्ट करील :—

(ए) अंशराशीकृत निवृत्तिवेतनाची रक्कम;

(बी) अंशराशीकृत निवृत्तिवेतनाच्या रकमेचे अंशराशीकृत मूल्य;

(सी) अंशराशीकृत मूल्य ज्या तारखेपासून प्रदेय होईल ती तारीख.

(दोन) लेखापरीक्षा अधिकारी, निवृत्तिवेतन प्रदान आदेश संवितरण प्राधिकरणाकडे पाठविण्यात आल्याची तारीख अर्जदाराला कळवील व अर्जदाराने त्या प्राधिकरणाकडून अंशराशीकृत मूल्य घ्यावे अशी सूचना देईल.

(तीन) लेखापरीक्षा अधिकारी, संबंधित संवितरण प्राधिकरणाकडे निवृत्तिवेतन प्रदान आदेश पाठविताना, निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण केल्यामुळे निवृत्तिवेतनाची रक्कम ज्या तारखेस कमी करावयाची त्या तारखेबाबतची नोंद निवृत्तिवेतन प्रदान आदेशामध्ये संवितरण प्राधिकरणाला करता यावी यासाठी नियम ६ मधील पोटनियम (१) च्या परंतुकाकडे त्या प्राधिकरणाचे लक्ष वेधील.

(चार) अर्जदारास अंशराशीकृत मूल्याचे प्रदान करण्यात आल्याची तारीख कळविण्याबाबतही लेखापरीक्षा अधिकारी संवितरण प्राधिकरणाला विनंती करील.

**16. Authorisation of the commuted value of a fraction of provisional pension**

(1) If pending determination of final pension, the Head of Office has sanctioned provisional pension to a Government servant under rule 126 of Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 and such a Government servant has applied for commutation of provisional pension in Form-A in accordance with the provisions of rule 9, the Head of Office on receipt of Form-A shall—

(*a*) take action as provided in sub-rule (1) of rule 14 and forward Form-A to the Audit Officer along with the pension papers duly completed as referred to in rule 123 of Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982, in case pension papers have not already been forwarded to the Audit Officer;

(*b*) request the Audit Officer to verify the correctness of the amount of provisional pension and the amount of the commuted value of the fraction of the provisional pension as determined in Part-III of Form-A.

(2) The Audit Officer on receipt of Form-A under sub-rule (1), shall verify the correctness of the amount of provisional pension and make further verification as provided in sub-rule (1) of rule 15.

(3) The Audit Officer after necessary verification of the amount of the provisional pension and the amount of the commuted value shall—

(*a*) issue authority for the payment of commuted value of pension to the Head of Office with the remarks that the commuted value may be drawn and disbursed to the applicant under intimation to him;

(*b*) draw the attention of the Head of Office to the proviso to sub-rule (1) of rule 6 so that the Head of Office may make reduction in the amount of provisional pension on account of commutation accordingly; and

(*c*) endorse to the applicant a copy of the authority referred to in clause (*a*) with the instructions that he should pursue the matter with the Head of Office.

(4) The Head of Office on receipt of authority from the Audit Officer under sub-rule (3), shall draw the amount ofcommuted value of pension and disburse the same to the applicant under intimation to the Audit Officer.

**१६. तात्पुरत्या निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकृत मूल्य प्राधिकृत करणे**

(१) निवृत्तिवेतन अंतिमरीत्या निर्धारित होईपर्यंत कार्यालय प्रमुखाने शासकीय कर्मचाऱ्याला महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १२६ अन्वये तात्पुरते निवृत्तिवेतन मंजूर केलेले असेल आणि त्या शासकीय कर्मचाऱ्याने नियम ९ च्या तरतुदीनुसार तात्पुरत्या निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणासाठी **नमुना "ए"** मध्ये अर्ज केलेला असेल तर, **नमुना "ए"** मिळाल्यानंतर, कार्यालय प्रमुख—

(ए) नियम १४ च्या पोटनियम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे कार्यवाही करील. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १२३ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे निवृत्तिवेतनविषयक कागदपत्रे लेखापरीक्षा अधिकाऱ्याकडे अगोदरच पाठविलेली नसतील तर, ती **नमुना "ए"** सोबत त्याच्याकडे पाठवील;

(बी) तात्पुरत्या निवृत्तिवेतनाची रक्कम आणि तिच्या काही भागाच्या अंशराशीकृत मूल्याची **नमुना "ए"** च्या भाग–तीनमध्ये निर्धारित केलेली रक्कम बरोबर आहे याबाबत पडताळणी करण्याची विनंती लेखापरीक्षा अधिकाऱ्याला करील.

(२) पोटनियम (१) अन्वये **नमुना "ए"** मिळाल्यानंतर लेखापरीक्षा अधिकारी तात्पुरत्या निवृत्तिवतनाची रक्कम बरोबर आहे हे पडताळून पाहील आणि नियम १५ च्या पोटनियम (१) मधील तरतुदीनुसार पुन्हा पडताळणी करील.

(३) तात्पुरते निवृत्तिवेतन आणि अंशराशीकृत मूल्य यांच्या रकमेच्या आवश्यक ती पडताळणी केल्यानंतर लेखापरीक्षा अधिकारी—

(ए) निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मूल्याचे प्रदान करण्यासाठी कार्यालय प्रमुखाकडे प्राधिकारपत्र पाठवील आणि त्यामध्ये अंशराशीकृत मूल्य काढून ते अर्जदाराला संवितरित करावे व तसे केल्याचे कळवावे, असा शेरा नमद करील;

(बी) अंशराशीकरणामुळे तात्पुरत्या निवृत्तिवेतनाची रक्कम कार्यालय प्रमुखास कमी करता यावी म्हणून नियम ६ च्या पोटनियम (१) मधील परंतुकाकडे त्याचे लक्ष वेधील; आणि

(सी) अर्जदाराने याबाबत कार्यालय प्रमुखाकडे पाठपुरावा करावा अशी सूचना देऊन खंड (ए) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्राधिकारपत्राची प्रत अर्जदाराकडे पाठवील.

(४) कार्यालय प्रमुख, लेखापरीक्षा अधिकाऱ्याकडून पोटनियम (३) अन्वये प्राधिकारपत्र मिळाल्यानंतर, निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मूल्याची रक्कम काढून ती अर्जदाराला संवितरित करील व तसे केल्याचे लेखापरीक्षा अधिकाऱ्याला कळवील.

(5) The Audit Officer shall on final assessment of pension—

(*a*) issue authority to the disbursing authority for the payment of the difference between the commuted value so determined and the commuted value already paid by the Head of Office;

(*b*) make entry in the Pension Payment Order to be issued on the cessation of the payment of the provisional pension by the Head of office, the fact of the payment of the commuted value of provisional pension by the Head of Office and also indicate the date from which the payment of the residuary pension shall commence.

(५) लेखापरीक्षा अधिकारी निवृत्तिवेतनाचे अंतिम निर्धारण झाल्यानंतर खालील-प्रमाणे कार्यवाही करील :—

(ए) अशा प्रकारे निर्धारित केलेले अंशराशीकृत मूल्य आणि कार्यालय प्रमुखाने अगोदरच दिलेले अंशराशीकृत मूल्य यांतील फरकाची रक्कम प्रदान करण्यासाठी संवितरण प्राधिकरणास, प्राधिकारपत्र देईल;

(बी) कार्यालय प्रमुखाकडून तात्पुरत्या निवृत्तिवेतनाची रक्कम देणे थांबविण्यात आल्यानंतर निवृत्तिवेतन प्रदान आदेश देताना त्यात, तात्पुरत्या निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य कार्यालय प्रमुखाने प्रदान केल्याबद्दलची नोंद करील. तसेच अवशिष्ट निवृत्तिवेतनाचे प्रदान ज्या तारखेपासून सुरू होईल ती तारीख देखील त्यात नमूद करील.

## CHAPTER–IV

## COMMUTATION OF PENSION AFTER MEDICAL EXAMINATION

### 17. Scope

The provisions of this Chapter shall apply to an applicant who is eligible to commute a fraction of his pension after medical examination.

### 18. Eligibility

An applicant who—

(*i*) retires on Invalid Pension under rule 68 of Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982; or

(*ii*) on absorption in or under a Corporation, Autonomous Body or a Local Authority, elects the alternative of receiving the death-*cum*-retirement gratuity and a lump sum in lieu of pension in terms of rule 67 of Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982; or

(*iii*) is compulsorily retired from service as penalty and is granted pension under rule 101 of Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982; or

(*iv*) is in receipt of Compassionate Pension under rule 102 of Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982; or

(*v*) has retired from service on one of the pensions referred to in rule 12 but his application for commutation has **not** been received by the Head of Office within **one year** of his retirement

shall be eligible to commute a fraction of his pension subject to the limit specified in rule 5 after he has been declared fit by the appropriate medical authority.

### 19. Application for commutation of pension

An applicant referred to in rule 18 shall apply to the Head of Office in Form-C for commutation of fraction of his pension including provisional pension sanctioned under rule 126 of Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982.

# प्रकरण–चार

## वैद्यकीय तपासणीनंतर निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण

### १७. व्याप्ती

निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण वैद्यकीय तपासणीनंतर करण्यास पात्र असलेल्या अर्जदाराला या प्रकरणातील तरतुदी लागू होतील.

### १८. पात्रता

समुचित वैद्यकीय प्राधिकाऱ्याकडून शारीरिकदृष्टया पात्र ठरविण्यात आल्यानंतर, नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेच्या अधीन राहून, आपल्या निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण करण्यास खालील अर्जदार पात्र होईल :—

(एक) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६८ अनुसार रुग्णता निवृत्तिवेतनावर सेवानिवृत्त होणारा अर्जदार; किंवा

(दोन) महामंडळ, स्वायत्त संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण यामध्ये किंवा या खाली सामावून घेतल्यावर, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६७ अनुसार, मृत्यु-नि-सेवानिवृत्ति उपदान व निवृत्तिवेतनाऐवजी ठोक रक्कम मिळण्याचा पर्याय निवडणारा अर्जदार; किंवा

(तीन) शिक्षा म्हणून सेवेमधून सक्तीने सेवानिवृत्त केलेला आणि महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १०१ अनुसार निवृत्तिवेतन मंजूर केलेला अर्जदार; किंवा

(चार) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १०२ अनुसार अनुकंपा निवृत्तिवेतन मिळत असलेला अर्जदार; किंवा

(पाच) नियम १२ मध्ये निर्दिष्ट केलेल्या निवृत्तिवेतनांपैकी एका निवृत्तिवेतनावर सेवानिवृत्त झालेला परंतु ज्याचा अंशराशीकरणाचा अर्ज, त्याच्या सेवानिवृत्तीनंतर **एक वर्षाच्या** आत कार्यालय प्रमुखाला मिळालेला नाही असा अर्जदार.

### १९. निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणासाठी अर्ज

नियम १८ मध्ये निर्दिष्ट केलेला अर्जदार आपल्या निवृत्तिवेतनाच्या काही भागाच्या अंशराशीकरणासाठी **नमुना "सी"** मध्ये कार्यालय प्रमुखाकडे अर्ज करील. त्या निवृत्तिवेतनामध्ये महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १२६ अन्वये मंजूर झालेल्या तात्पुरत्या निवृत्तिवेतनाचाही समावेश असेल.

**20. Action to be taken by the Head of Office on application for commutation of pension**

(1) The Head of Office on receipt of application in Part-I of Form-C under rule 19 shall—

(*a*) acknowledge immediately the receipt of Form-C in Part-II of that Form and despatch the same to the applicant;

(*b*) forward Form-C in original to the Audit Officer in Part-III of that Form with the request that Part-IV of that Form may be completed immediately and returned to him as early as possible so that action for getting the applicant examined by the appropriate medical authority is taken.

(2) The Audit Officer on receipt of Form-C from the Head of Office under sub-rule (1) shall complete Part-IV of that Form and transmit the same to the Head of Office as early as possible.

(3) The Head of Office on receipt of Form-C from the Audit Officer under sub-rule (2) shall address in Form-D to the Medical Board/ Civil Surgeon/District Medical Officer or Superintendent of Government Hospital, as the case may be, where the applicant desires to be medically examined and forward to him the following documents:—

(*i*) Form-C with Part-IV of that Form duly completed in original;

(*ii*) two copies of the applicant's photograph of which one shall be an attested copy;

(*iii*) a copy of Form-E with a spare copy of Part-III of that Form;

(*iv*) report or statement of the applicant's case if he has been granted Invalid Pension or has previously commuted a part of his pension or declined to accept commutation on the basis of an addition of years to his actual age or has been refused commutation on medical grounds.

(4) A copy of letter in Form-D addressed to the medical authority as referred to in sub-rule (3) shall be endorsed to the applicant and the Audit Officer by the Head of Office.

## २०. निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाच्या अर्जावर कार्यालय प्रमुखाने करावयाची कार्यवाही

(१) नियम १९ अनुसार **नमुना "सी"** च्या भाग–एकमधील अर्ज मिळाल्यानंतर कार्यालय प्रमुख—

(ए) **नमुना "सी"** मिळाल्याची पोच त्या नमुन्याच्या भाग–दोनमध्ये ताबडतोब देईल व तो भाग अर्जदाराकडे पाठवील;

(बी) मूळ **नमुना "सी"** त्यातील भाग–तीनसह लेखापरीक्षा अधिकाऱ्याकडे पाठवील आणि अर्जदाराची समुचित वैद्यकीय प्राधिकाऱ्याकडून वैद्यकीय तपासणी करवून घेण्यासंबंधी कार्यवाही करता यावी म्हणून त्यातील भाग–चार त्वरित पूर्ण करून तो नमुना शक्य तितक्या लवकर परत पाठवावा, अशी त्याला विनंती करील.

(२) लेखापरीक्षा अधिकारी, पोटनियम (१) अनुसार कार्यालय प्रमुखाकडून **नमुना "सी"** मिळाल्यानंतर, त्या नमुन्याचा भाग–चार पूर्ण करील आणि तो नमुना शक्य तितक्या लवकर कार्यालय प्रमुखाकडे पाठवून देईल.

(३) कार्यालय प्रमुख पोटनियम (२) अनुसार लेखापरीक्षा अधिकाऱ्याकडून **नमुना "सी"** मिळाल्यानंतर, जेथे वैद्यकीय तपासणी करून घेण्याची अर्जदाराची इच्छा असेल तेथील वैद्यकीय मंडळ/जिल्हा शल्यचिकित्सक/जिल्हा वैद्यकीय अधिकारी किंवा यथास्थिति, शासकीय रुग्णालयाचा अधीक्षक यास **नमुना "डी"** मध्ये पत्र लिहील आणि खालील कागदपत्रे त्याच्याकडे पाठवील :—

(एक) **नमुना "सी"** चा भाग–चार यथोचितरीत्या पूर्ण करून तो मूळ नमुना;

(दोन) अर्जदाराच्या छायाचित्राच्या दोन प्रती. त्यापैकी एक प्रत साक्षांकित केलेली असली पाहिजे;

(तीन) **नमुना "ई"** ची एक प्रत आणि त्या नमुन्याच्या भाग–तीनची एक जादा प्रत;

(चार) अर्जदाराला रुग्णता निवृत्तिवेतन मंजूर करण्यात आले असेल किंवा त्याने आपल्या निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे यापूर्वीच अंशराशीकरण केलेले असेल किंवा त्याच्या प्रत्यक्ष वयामध्ये काही वर्षांची भर घालण्यात आल्यामुळे अंशराशीकरण स्वीकारण्यास त्याने नकार दिला असेल किंवा वैद्यकीय कारणास्तव त्याला अंशराशीकरण नाकारण्यात आले असेल तर, त्या अर्जदाराच्या प्रकरणाबाबतचा अहवाल किंवा निवेदन.

(४) पोटनियम (३) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे वैद्यकीय प्राधिकाऱ्याला लिहिलेल्या **नमुना "डी"** मधील पत्राची प्रत कार्यालय प्रमुख, अर्जदाराला व लेखापरीक्षा अधिकाऱ्याला पाठवील.

**21. Action to be taken by medical authority**

(1) The medical authority on receipt of documents referred to in sub-rule (3) of rule 20 shall—

(*a*) arrange as far as possible for the medical examination of the applicant by the medical authority at the nearest available station indicated by the applicant in Form-C;

(*b*) transmit the documents referred to in sub-rule (3) of rule 20 to the medical authority with the direction to examine the applicant as provided in rule 25;

(*c*) inform the applicant as to where and when he should appear for medical examination or, if necessary, direct the medical authority to communicate to the applicant the date and time of such examination.

(2) In fixing the date of medical examination, it shall be ensured that the medical examination is held, as far as possible, before the date of applicant's next birthday.

**22. Medical authority**

(1) Save as otherwise provided in sub-rule (2), the medical authority shall be a Medical Board, where an applicant for commutation of pension—

(*a*) seeks commutation of Invalid Pension; or

(*b*) seeks commutation of pension other than Invalid Pension but the amount of pension to be commuted together with the amount or amounts previously commuted exceeds *one hundred rupees* per mensem; or

(*c*) has been refused commutation on medical grounds or if he having once declined to accept commutation on the basis of addition of years to his actual age recommended by the medical authority, applied for a second medical examination in accordance with the provisions of rules 26 and 27.

(2) In any other cases not covered by sub-rule (1), the medical authority shall be a Medical Officer not lower in status than that of a Civil Surgeon/District Medical Officer or Superintendent of Government Hospital.

**23. Fee for medical examination to be borne by the applicant**

The applicant shall be required to pay for medical examination such fee as may be specified by the State Government.

## २१. वैद्यकीय प्राधिकाऱ्याने करावयाची कार्यवाही

(१) नियम २० मधील पोटनियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेले कागदपत्र मिळाल्यानंतर वैद्यकीय प्राधिकारी,—

(ए) शक्यतोवर, अर्जदाराने **नमुना " सी "** मध्ये नमूद केलेल्या नजिकच्या ठिकाणी, वद्यकीय प्राधिकाऱ्याकडन अर्जदाराच्या वैद्यकीय तपासणीची व्यवस्था करील;

(बी) नियम २० मधील पोटनियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेले कागदपत्र वैद्यकीय प्राधिकाऱ्याकडे पाठवील आणि नियम २५ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे अर्जदाराची तपासणी करण्यासाठी निदेश देईल ;

(सी) अर्जदाराने वैद्यकीय तपासणीसाठी कोठे व केव्हा हजर राहावयाचे याबाबत त्याला कळवील किंवा, आवश्यक असल्यास, अशा तपासणीची तारीख व वेळ अर्जदाराला कळविण्याचा निदेश वैद्यकीय प्राधिकाऱ्यास दईल.

(२) वैद्यकीय तपासणीची तारीख ठरविताना, ती तपासणी शक्यतोवर अर्जदाराच्या पुढील जन्मदिनाच्या तारखेपूर्वी होईल अशी खात्री करून घेण्यात यईल.

## २२. वैद्यकीय प्राधिकारी

(१) पोटनियम (२) मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त निवत्ति-वेतनाच्या अंशराशीकरणासाठी अर्ज करताना—

(ए) अर्जदार रुग्णता निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची मागणी करीत असेल; किंवा

(बी) तो रुग्णता निवृत्तिवेतनाखेरीज इतर निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची मागणी करीत असेल, परंतु अंशराशीकरण करावयाची रक्कम आणि अगोदर अंशराशीकरण केलेली रक्कम यांनी मिळून होणारी एकूण रक्कम दरमहा शंभर रुपयांहून अधिक होत असेल; किंवा

(सी) त्याला वैद्यकीय कारणास्तव अंशराशीकरण नामंजूर केले असेल किंवा वैद्यकीय प्राधिकाऱ्याने शिफारस केल्याप्रमाणे त्याच्या प्रत्यक्ष वयात काही वर्षांची भर घातल्यामुळे अंशराशीकरण स्वीकारण्यास त्याने एकदा नकार दिलेला असेल आणि त्यानंतर नियम २६ व नियम २७ मधील तरतुदींनुसार दुसऱ्या वैद्यकीय तपासणीसाठी अर्ज केलेला असेल;

त्याच्या बाबतीत वैद्यकीय प्राधिकारी म्हणजे वैद्यकीय मंडळ असेल.

(२) पोटनियम (१) मध्ये अंतर्भूत न झालेल्या इतर कोणत्याही प्रकरणी, वैद्यकीय प्राधिकारी म्हणजे, जिल्हा शल्यचिकित्सक/जिल्हा वैद्यकीय अधिकारी किंवा शासकीय रुग्णालयातील अधीक्षक यांच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेला वैद्यकीय अधिकारी.

## २३. अर्जदाराने वैद्यकीय तपासणीसाठी द्यावयाची फी

वैद्यकीय तपासणीसाठी राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशी फी अर्जदाराने देणे आवश्यक असेल.

**24. Failure to appear before medical authority**

(1) If the applicant after receipt of communication from the appropriate medical authority referred to in clause (*c*) of sub-rule (1) of rule 21, fails to appear for medical examination before the medical authority on the date and time communicated to him (including any change therein either at the request of the applicant or due to administrative reasons) and there is no reasonable ground for his failure, the medical authority shall report the fact to the Head of Office concerned and return to him the documents received under clause (*b*) of sub-rule (1) of rule 21.

(2) With the return of documents to the Head of Office under sub-rule (1), the application for commutation shall be treated as having been withdrawn.

**25. Procedure for medical examination**

(1) The medical authority shall—

(*a*) obtain from the applicant a statement in Part-I of Form-E duly signed by the applicant in its presence;

(*b*) subject the applicant to medical examination and enter the result thereof in Part-II of Form-E;

(*c*) attest the unattested copy of the photograph of the applicant;

(*d*) complete the certificate contained in Part-III of Form-E: Provided that where—

(*i*) an applicant has been granted Invalid Pension, or

(*ii*) an applicant has previously commuted a part of his pension, or

(*iii*) an applicant has been refused commutation on medical grounds, or

(*iv*) an applicant had declined to accept the commutation on the basis of addition of years to his actual age;

the medical authority shall, before completing the certificate contained in Part-III of Form-E take into consideration the statement of the medical cases of the applicant.

(2) After complying with the requirements of sub-rule (1), the medical authority shall without delay forward to the Audit Officer who has already completed Part-IV of Form-C, the following documents, namely :—

(*a*) Form C in original;

(*b*) attested copy of the applicant's photograph;

(*c*) Form-E in original; and

(*d*) a certified copy of Form-E to the Head of Office who has countersigned Part-IV of Form-C.

(3) The medical authority shall also send to the applicant a certified copy of Part-III of Form-E.

## २४. वैद्यकीय प्राधिकाऱ्यासमोर अनुपस्थिती

(१) नियम २१ मधील पोटनियम (१) च्या खंड (सी) मध्ये निर्दिष्ट केलेल्या समुचित वैद्यकीय प्राधिकाऱ्याकडून पत्र मिळाल्यानंतर, कळविलेल्या तारखेला व वेळेला (अर्जदाराच्या विनंतीवरून किंवा प्रशासकीय कारणामुळे त्यात झालेले बदल लक्षात घेऊन) वैद्यकीय प्राधिकाऱ्यासमोर अर्जदार वैद्यकीय तपासणीसाठी उपस्थित राहिला नाही आणि त्यामागे कोणतेही वाजवी कारण नसेल तर, वैद्यकीय प्राधिकारी ती वस्तुस्थिती संबंधित कार्यालय प्रमुखाला कळवील आणि नियम २१ मधील पोटनियम (१) च्या खंड (बी) अनुसार मिळालेली कागदपत्रे त्याच्याकडे परत पाठवील.

(२) पोटनियम (१) अनुसार कागदपत्रे कार्यालय प्रमुखाकडे परत आल्यानंतर अंशराशीकरणासाठी केलेला अर्ज मागे घेतला गेला आहे, असे मानले जाईल.

## २५. वैद्यकीय तपासणीकरिता कार्यपद्धती

(१) वैद्यकीय प्राधिकारी—

(ए) त्याच्या समक्ष अर्जदाराने यथोचितरीत्या सही केलेले **नमुना "ई"** च्या भाग–एक मधील निवेदन अर्जदाराकडून मिळवील;

(बी) अर्जदाराला वैद्यकीय तपासणीसाठी पाठवील आणि **नमुना "ई"** च्या भाग–दोनमध्ये तपासणीचा निष्कर्ष नमूद करील;

(सी) अर्जदाराच्या छायाचित्राची साक्षांकित न केलेली प्रत साक्षांकित करील;

(डी) **नमुना "ई"** च्या भाग–तीनमधील प्रमाणपत्र पूर्ण करील:

मात्र, **नमुना "ई"** च्या भाग–तीनमधील प्रमाणपत्र पूर्ण करण्यापूर्वी, वैद्यकीय प्राधिकारी अर्जदाराच्या वैद्यकीय वृत्तांतासंबंधीचे निवेदन पुढील बाबतीत विचारात घेईल:—

(एक) अर्जदाराला रुग्णता निवृत्तिवेतन मंजूर केलेले आहे; किंवा

(दोन) अर्जदाराने त्याच्या निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण पूर्वी केलेले आहे; किंवा

(तीन) अर्जदाराला वैद्यकीय कारणांवरून अंशराशीकरण नामंजूर करण्यात आलेले आहे; किंवा

(चार) अर्जदाराच्या प्रत्यक्ष वयामध्ये काही वर्षांची भर घातल्यामुळे अंशराशीकरण स्वीकारण्यास त्याने नकार दिलेला आहे.

(२) ज्या लेखापरीक्षा अधिकाऱ्याने **नमुना "सी"** चा भाग–चार अगोदरच पूर्ण केलेला आहे त्याच्याकडे, वैद्यकीय प्राधिकारी, पोटनियम (१) मधील आवश्यक बाबी पूर्ण केल्यानंतर, खालील कागदपत्रे विलंब न करता पाठवील:—

(ए) मूळ **नमुना "सी"**;

(बी) अर्जदाराच्या छायाचित्राची साक्षांकित प्रत;

(सी) मूळ **नमुना "ई"**; आणि

(डी) **नमुना "सी"** चा भाग–चार प्रतिस्वाक्षरित करणाऱ्या कार्यालय प्रमुखाकडे **नमुना "ई"** ची प्रमाणित प्रत.

(३) वैद्यकीय प्राधिकारी **नमुना "ई"** च्या भाग–तीनची प्रमाणित प्रतसुद्धा अर्जदाराकडे पाठवील.

**26. Second medical examination**

(1) Subject to the provisions of rule 27, the medical examination in the case of an applicant referred to in clause (*c*) of sub-rule (1) of rule 22 shall take place after the expiry of a period of not less than **one year** from the date of the first medical examination.

(2) If the applicant desires to be re-examined on the expiry of the period specified in sub-rule (1), the examination shall be by a Medical Board at his own expense. For this purpose, he shall address a letter to the Head of Office with the request that arrangements for his re-examination by a Medical Board may be made. He shall indicate in the letter—

(*a*) the medical authority which examined him earlier, and the date on which such examination took place,

(*b*) the place where he was examined,

(*c*) the opinion of the medical authority,

(*d*) the date of birth and the date of retirement,

(*e*) designation of the post held at the time of retirement,

(*f*) the amount of pension authorised,

(*g*) the fraction of pension which was originally applied for commutation.

(3) The Head of Office on receipt of letter under sub-rule (2) shall address the medical authority for arranging re-examination of the applicant by a Medical Board and forward the following documents to such authority—

(*a*) letter in original received from the applicant;

(*b*) the certified copy of Form-E received earlier by the Head of Office from the medical authority under clause (*d*) of sub-rule (2) of rule 25.

(4) The medical authority on receipt of the communication from the Head of Office under sub-rule (3) shall inform the applicant as to where and when he should appear for medical examination before the Medical Board or if necessary direct the Medical Board to communicate to the applicant the place, date and time of such examination.

(5) The applicant after the receipt of communication under sub-rule (4) shall appear before the Medical Board at the place and on the date and time communicated to him.

२६. दुसरी वैद्यकीय तपासणी

(१) नियम २७ मधील तरतुदींच्या अधीन राहून, नियम २२ मधील पोटनियम (१) च्या खंड (सी) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अर्जदाराची वैद्यकीय तपासणी, पहिल्या वैद्यकीय तपासणीच्या तारखेपासून एक **वर्षापेक्षा** कमी नसलेल्या कालावधीनंतर करण्यात आली पाहिजे.

(२) पोटनियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी संपल्यानंतर पुन्हा तपासणी व्हावी अशी अर्जदाराची इच्छा असेल तर, तशी तपासणी अर्जदाराच्या खर्चाने वैद्यकीय मंडळाकडून केली जाईल. त्यासाठी वैद्यकीय मंडळाकडून आपली पुन्हा तपासणी व्हावी म्हणून व्यवस्था करण्याबाबत विनंती करणारे पत्र त्याने कार्यालय प्रमुखाला पाठवावे. त्या पत्रात पुढील माहिती नमूद करावी:—

(ए) या अगोदर त्याची तपासणी करणारा वैद्यकीय प्राधिकारी व अशा तपासणीची तारीख,

(बी) तपासणी केल्याचे ठिकाण,

(सी) वैद्यकीय प्राधिकाऱ्याचे मत,

(डी) जन्मतारीख व सेवानिवृत्तीचा दिनांक,

(ई) सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद,

(एफ) प्राधिकृत निवृत्तिवेतनाची रक्कम,

(जी) ज्या भागाच्या अंशराशीकरणासाठी प्रारंभी अर्ज केला होता तो निवृत्तिवेतनाचा भाग.

(३) पोटनियम (२) अनुसार पत्र मिळाल्यानंतर कार्यालय प्रमुख, वैद्यकीय मंडळाकडून अर्जदाराची पुन्हा तपासणी करण्याच्या व्यवस्थेसाठी वैद्यकीय प्राधिकाऱ्याला पत्र लिहील आणि अशा प्राधिकाऱ्याकडे खालील कागदपत्रे पाठवील.—

(ए) अर्जदाराकडून मिळालेले मूळ पत्र,

(बी) नियम २५ मधील पोटनियम (२) च्या खंड (डी) अनुसार वैद्यकीय प्राधिकाऱ्याकडून कार्यालय प्रमुखाला अगोदर मिळालेली **नमुना ' ई '** ची प्रमाणित प्रत.

(४) पोटनियम (३) अनुसार कार्यालय प्रमुखाचे पत्र मिळाल्यानंतर वैद्यकीय प्राधिकारी, अर्जदाराने वैद्यकीय तपासणीसाठी वैद्यकीय मंडळासमोर कोठे व केव्हा उपस्थित राहावयाचे ते अर्जदाराला कळवील किंवा आवश्यक असेल तर अशा तपासणीचे ठिकाण, तारीख व वेळ अर्जदारास कळवावी असा वैद्यकीय मंडळास निदेश देईल.

(५) पोटनियम (४) अनुसार पत्र मिळाल्यानंतर त्याला कळविण्यात आले असेल त्या ठिकाणी, त्या तारखेस व त्यावेळी वैद्यकीय मंडळासमोर अर्जदार उपस्थित राहील.

(6) The Medical Board shall examine the applicant and if after the examination, it is of the view that the earlier opinion of the medical authority needs no revision or modification or needs revision or modification shall record its opinion and communicate the same to the Head of Office under intimation to the applicant. The documents received by the Medical Board under sub-rule (3) shall also be returned to the Head of Office.

(7) If as a result of the opinion of the Medical Board received by the Head of Office under sub-rule (6), the applicant becomes eligible to commute a fraction of pension originally applied for, the Head of Office shall determine the commuted value with reference to the Table applicable on the date, the Medical Board recorded its opinion. The Head of Office thereafter shall request the Audit Officer to take further action for the authorisation of the commuted value and forward the following documents to him:—

(*i*) letter in original received from the applicant under sub-rule (2),

(*ii*) the opinion of the Medical Board received under sub-rule (6) in original.

(*iii*) calculation sheet showing the commuted value determined with reference to the revised or modified opinion of the Medical Board.

(8) The Audit Officer on receipt of the documents under sub-rule (7) shall verify the correctness of the commuted value determined by the Head of Office and thereafter take action to authorise the commuted value to the applicant under intimation to the Head of Office.

**27. Appeal against the findings of medical authority**

(1) Notwithstanding anything contained in rule 26, an applicant referred to in clause (*c*) of sub-rule (1) of rule 22 shall be eligible for second medical examination before the expiry of the period specified in sub-rule (1) of rule 26, if he feels that the medical authority in refusing commutation on medical grounds or making addition of years to his actual age has committed an error of judgement. Such an applicant may, within **one month** of the receipt of the certified copy of Part-III of Form-E from the medical authority, prefer an appeal by addressing a letter to the Head of Office that the opinion of the medical authority may be got reviewed by another medical authority mentioned in sub-rule (2) at his own expense. He shall indicate in the letter—

(*a*) the medical authority which had examined him earlier and the date on which the examination took place;

(*b*) the place where he was examined;

(६) वैद्यकीय मंडळ अर्जदाराची तपासणी करील आणि तपासणीनंतर त्या मंडळाला असे वाटले की, वैद्यकीय प्राधिकाऱ्याचे अगोदरचे मत सुधारण्याची किंवा त्यात फेरबदल करण्याची आवश्यकता नाही किंवा आवश्यकता आहे, तर मंडळ आपले ते मत लेखी नमूद करील आणि कार्यालय प्रमुखाला व अर्जदाराला देखील ते कळवील. पोटनियम (३) अनुसार मिळालेली कागदपत्रे वैद्यकीय मंडळ कार्यालय प्रमुखाकडे परत पाठवील.

(७) पोटनियम (६) अनुसार कार्यालय प्रमुखाला कळविण्यात आलेल्या वैद्यकीय मंडळाच्या मतामुळे, अर्जदाराने प्रारंभी निवृत्तिवेतनाच्या जितक्या भागाच्या अंशराशीकरणासाठी अर्ज केला होता, तितक्या भागाच्या अंशराशीकरणाकरिता तो पात्र ठरत असेल तर, वैद्यकीय मंडळाने आपले मत ज्या तारखेस नमूद केले त्या तारखेस लागू असलेल्या तक्त्याच्या आधारे अंशराशीकृत मूल्य कार्यालय प्रमुख निर्धारित करील. त्यानंतर कार्यालय प्रमुख, अंशराशीकृत मूल्य प्राधिकृत करण्यासंबंधी पुढील कार्यवाही करण्यासाठी लेखापरीक्षा अधिकाऱ्याला विनंती करील आणि खालील कागदपत्र त्यांच्याकडे पाठवील :—

(एक) पोटनियम (२) अनुसार अर्जदाराकडून मिळालेले मूळ पत्र,

(दोन) पोटनियम (६) अनुसार वैद्यकीय मंडळाचे मत नमूद केलेल्या पत्राची मूळ प्रत,

(तीन) वैद्यकीय मंडळाच्या सुधारित किंवा फेरबदल केलेल्या मताच्या संदर्भात, निर्धारित केलेले अंशराशीकृत मूल्य दर्शविणारे हिशेब पत्र.

(८) पोटनियम (७) अनुसार कागदपत्रे मिळाल्यानंतर लेखापरीक्षा अधिकारी, कार्यालय प्रमुखाने निर्धारित केलेले अंशराशीकृत मूल्य बरोबर आहे हे पडताळून पाहील आणि त्यानंतर अजदाराला अंशराशीकृत मूल्य प्राधिकृत करून तसे कार्यालय प्रमुखाला कळवील.

## २७. वैद्यकीय प्राधिकाऱ्याच्या निष्कर्षाविरुद्ध अपील

(१) नियम २६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नियम २२ मधील पोटनियम (१) च्या खंड (सी) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अर्जदारास असे वाटत असेल की, वैद्यकीय कारणास्तव अंशराशीकरण नाकारण्यात किंवा त्याच्या प्रत्यक्ष वयात काही वर्षांची भर घालण्यात, वैद्यकीय प्राधिकाऱ्याची चूक झाली आहे तर, नियम २६ मधील पोटनियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी संपण्यापूर्वी दुसऱ्या वैद्यकीय तपासणीस अर्जदार पात्र होईल. वैद्यकीय प्राधिकाऱ्याकडून **नमुना "ई"** च्या भाग-तीनची प्रमाणित प्रत मिळाल्यापासून **एक महिन्याच्या आत** असा अर्जदार स्वतःच्या खर्चाने, **वैद्यकीय** प्राधिकाऱ्याचे मत पोटनियम (२) मध्ये उल्लेखिलेल्या दुसऱ्या वैद्यकीय प्राधिकाऱ्याकडून पुन्हा तपासून पहावे, असे कार्यालय प्रमुखाच्या नावे पत्र लिहून अपील दाखल करू शकेल. तो आपल्या पत्रात पुढील बाबींचा उल्लेख करील :—

(ए) या अगोदर त्याची तपासणी करणारा वैद्यकीय प्राधिकारी व अशा तपासणीची तारीख;

(बी) तपासणी केल्याचे ठिकाण,

(*c*) the opinion of the medical authority;
(*d*) the date of birth and the date of retirement;
(*e*) designation of the post held at the time of retirement;
(*f*) the amount of pension authorised;
(*g*) the fraction of pension which was originally applied for commutation.

(2) In case an applicant referred to in sub-rule (1)—

(*a*) was examined previously by a Medical Officer, not lower in status than Civil Surgeon or a District Medical Officer or Superintendent of Government Hospital, he shall be re-examined by a Medical Board, or

(*b*) was previously examined by a Medical Board, he shall be re-examined by a second Medical Board, the members of which shall be different from those of the first Medical Board.

(3) The Head of Office shall, within **one month** of the receipt of letter under sub-rule (1), take steps for arranging the re-examination of the applicant. For this purpose, he shall address the medical authority, where the applicant was examined previously. He shall, while addressing the medical authority, invite his attention to the provisions of sub-rule (2) and forward to it the following documents:—

(*a*) letter received from the applicant in original ;
(*b*) certified copy of Form-E received earlier by the Head of Office from the medical authority under clause (*d*) of sub-rule (2) of rule 25.

(4) The medical authority on receipt of communication from the Head of Office under sub-rule (3) shall arrange for the second medical examination of the applicant by a Medical Board which shall be constituted in accordance with the provisions of sub-rule (2). The medical authority shall, thereafter, inform the applicant as to where and when he should appear for medical examination before the Medical Board or, if necessary, direct the Medical Board to communicate to the applicant the place, date and time of such examination.

(5) The applicant on receipt of communication under sub-rule (4) shall appear for the medical examination before the Medical Board on the date and time, communicated to him.

(6) The Medical Board shall examine the applicant and if after the examination, it is of the view that the earlier opinion of the medical authority needs no revision or modification or needs revision or modification shall record its opinion and communicate the same to the Head of Office under intimation to the applicant and the findings of the Medical Board shall be binding on the applicant.

(सी) वैद्यकीय प्राधिकाऱ्याचे मत,
(डी) जन्मतारीख व सेवानिवृत्तीचा दिनांक,
(ई) सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद,
(एफ) प्राधिकृत निवृत्तिवेतनाची रक्कम,
(जी) ज्या भागाच्या अंशराशीकरणासाठी प्रारंभी अर्ज केला होता तो निवृत्तिवेतनाचा भाग.

(२) पोटनियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अर्जदाराची तपासणी —

(ए) पूर्वी शल्यचिकित्सक किंवा जिल्हा वैद्यकीय अधिकारी किंवा शासकीय रुग्णालयाचे अधीक्षक यांच्याहून कमी दर्जा नसणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याने केलेली असेल तर त्याची वैद्यकीय मंडळाकडून पुन्हा तपासणी केली जाईल, किंवा

(बी) पूर्वी वैद्यकीय मंडळाकडून करण्यात आलेली असेल तर, त्याची पुन्हा तपासणी पहिल्या वैद्यकीय मंडळातील सदस्यांपेक्षा वेगळे सदस्य असणाऱ्या दुसऱ्या वैद्यकीय मंडळाकडून केली जाईल.

(३) पोटनियम (१) अनुसार पत्र मिळाल्यानंतर **एक महिन्याच्या आत,** कार्यालय प्रमुख अर्जदाराची पुन्हा तपासणी करण्याची व्यवस्था करील. यासाठी अर्जदाराची पूर्वीची तपासणी कोठे झाली होती ते वैद्यकीय प्राधिकाऱ्याला कळवील. त्या वैद्यकीय प्राधिकाऱ्याला पत्र लिहिताना तो पोटनियम (२) च्या तरतुदींकडे त्याचे लक्ष वेधून खालील कागदपत्रे त्याच्याकडे पाठवील :—

(ए) अर्जदाराकडून मिळालेले मूळ पत्र;

(बी) नियम २५ मधील पोटनियम (२) च्या खंड (डी) अनुसार वैद्यकीय प्राधिकाऱ्याकडून कार्यालय प्रमुखाला पूर्वी मिळालेल्या **नमुना 'ई'** ची प्रमाणित प्रत.

(४) पोटनियम (३) अनुसार कार्यालय प्रमुखाकडून पत्र मिळाल्यानंतर वैद्यकीय प्राधिकारी, पोटनियम (२) मधील तरतुदींनुसार नेमल्या जाणाऱ्या वैद्यकीय मंडळाकडून अर्जदाराची दुसरी वैद्यकीय तपासणी करून घेण्याची व्यवस्था करील. यानंतर, अर्जदाराने वैद्यकीय तपासणीसाठी वैद्यकीय मंडळासमोर कोठे व केव्हा उपस्थित राहावयाचे ते त्याला वैद्यकीय प्राधिकारी कळवील किंवा आवश्यक असेल तर, अशा तपासणीचे ठिकाण, तारीख व वेळ वैद्यकीय मंडळाने अर्जदारास कळवावी असा वैद्यकीय मंडळास निदेश देईल.

(५) पोटनियम (४) अनुसार पत्र मिळाल्यानंतर, वैद्यकीय तपासणीसाठी कळविण्यात आलेल्या तारखेला व वेळेला वैद्यकीय मंडळासमोर अर्जदार उपस्थित राहील.

(६) वैद्यकीय मंडळ अर्जदाराची तपासणी करील आणि तपासणीनंतर त्या मंडळाला असे वाटले की, वैद्यकीय प्राधिकाऱ्यांचे अगोदरचे मत सुधारण्याची किंवा त्यात फेरबदल करण्याची आवश्यकता नाही किंवा आवश्यकता आहे, तर मंडळ आपले ते मत लेखी नमूद करील आणि कार्यालय प्रमुखाला व अर्जदाराला देखील ते कळवील. वैद्यकीय मंडळाचे निष्कर्ष अर्जदारावर बंधनकारक असतील.

(7) If the Medical Board as a result of the second medical examination of the applicant, sets aside or modifies the opinion of the first medical authority, the findings of the Medical Board shall be deemed to have come into force on the date on which the first medical authority recorded its opinion and the claim of the applicant for commutation shall be settled accordingly.

(8) Nothing contained in this rule shall apply to an applicant in whose case the medical authority as a result of the first medical examination had directed that the applicant's age for the purpose of commutation should be assumed to be greater than his actual age, and the applicant received the commuted value with reference to the enhanced age.

**28. Withdrawal of application**

(1) The applicant may after giving a notice in writing, to the Head of Office, withdraw his application at any time before subjecting himself to the medical examination before the medical authority but in no case after he has appeared before such authority.

(2) In case the medical authority directs that the applicant's age for the purpose of commutation shall be assumed to be greater than his actual age, the applicant may—

(*a*) by giving notice in writing to the Head of Office withdraw his application within **fourteen days** from the date on which he received the certified copy of Part-III of Form-E and endorse a copy of notice to the Audit Officer, or

(*b*) request the Head of Office within the period specified in clause (*a*) under intimation to the Audit Officer that he may be permitted to reduce the amount of pension already applied for commutation to an amount to be indicated by the applicant.

(3) Where a request for withdrawal has not been made by the applicant within the time specified in clause (*a*) of sub-rule (2), it shall be presumed that he has accepted the findings of the medical authority and the Audit Officer shall take action to authorise the payment of commuted value of pension.

(4) If a request for reduction in the amount of pension to be commuted is made as provided in clause (*b*) of sub-rule (2), the Audit Officer shall authorise the payment of commuted value of pension with reference to the reduced amount.

(७) अर्जदाराची दुसरी वैद्यकीय तपासणी केल्यानंतर वैद्यकीय मंडळाने, पहिल्या वैद्यकीय प्राधिकाऱ्याचे मत रद्द ठरविले असेल किंवा त्यात फेरबदल केला असेल तर, ज्या दिवशी पहिल्या वैद्यकीय प्राधिकाऱ्याने ज्या तारखेस आपले मत लेखी नमूद केले, त्या तारखेपासून या वद्यकीय मंडळाचा निष्कर्ष अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार अर्जदाराच्या निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची मागणी पूर्ण केली जाईल.

(८) एखाद्या अर्जदाराच्या बाबतीत पहिल्या वैद्यकीय तपासणीनंतर अर्जदाराचे वय अंशराशीकरणाच्या प्रयोजनासाठी त्याच्या प्रत्यक्ष वयापेक्षा जास्त असल्याचे मानावे असा निदश वैद्यकीय प्राधिकाऱ्याने दिला असेल, आणि अर्जदाराला त्या वाढीव वयानुसार अंशराशीकृत मूल्य मिळालेले असेल तर, त्या अर्जदाराला या नियमांतील कोणतीही बाब लागू होणार नाही.

**२८. अर्ज मागे घेणे**

(१) कार्यालय प्रमुखाला लेखी सूचना दिल्यानंतर, वैद्यकीय प्राधिकाऱ्यासमोर वैद्यकीय तपासणीसाठी उपस्थित होण्यापूर्वी कोणत्याही वेळी, अर्जदाराला आपला अर्ज माग घेता येईल. मात्र, एकदा अशा प्राधिकाऱ्यासमोर उपस्थित राहिल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत अर्ज मागे घेता येणार नाही.

(२) अंशराशीकरणाच्या प्रयोजनासाठी अर्जदाराचे वय त्याच्या प्रत्यक्ष वयापेक्षा जास्त मानले जाईल असा निदेश वैद्यकीय प्राधिकाऱ्याने दिलेला असेल तर अर्जदार—

(ए) त्याला **नमुना "ई"** च्या भाग–तीनची प्रमाणित प्रत मिळाल्याच्या तारखेपासून **चौदा दिवसांच्या आत,** कार्यालय प्रमुखाला लेखी सूचना देऊन आपला अर्ज मागे घेऊ शकेल आणि त्या सूचनची एक प्रत लेखापरीक्षा अधिकाऱ्याला पाठवू शकेल; किंवा

(बी) अंशराशीकरणासाठी अगोदरच अर्ज केलेल्या निवृत्तिवेतनाची रक्कम त्याने नमूद केलेल्या रकमेइतकी कमी करण्यास त्याला परवानगी द्यावी अशी खंड (ए) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत, कार्यालय प्रमुखास विनंती करू शकेल आणि तसे लेखापरीक्षा अधिकाऱ्यालाही कळवू शकेल.

(३) पोटनियम (२) मधील खंड (ए) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत अर्ज मागे घेण्याची विनंती अर्जदाराकडून आलेली नसेल तेव्हा, त्याने वैद्यकीय प्राधिकाऱ्याचा निष्कर्ष स्वीकारला आहे असे गृहीत धरले जाईल आणि लेखापरीक्षा अधिकारी निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मूल्याचे प्रदान प्राधिकृत करण्याची कार्यवाही करील.

(४) अंशराशीकरण करावयाच्या निवृत्तिवेतनाची रक्कम कमी करण्याची विनंती, पोटनियम (२) मधील खंड (बी) मध्य तरतूद केल्याप्रमाण करण्यात आली असेल तर, लेखापरीक्षा अधिकारी कमी केलेल्या रकमेप्रमाणे निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मूल्याचे प्रदान प्राधिकृत करील.

(5) If the applicant is informed by the Audit Officer under rule 29 that on account of modification of the Table, the commuted value becoming payable to the applicant will be less than the value communicated to him in Form-D, it shall be open to the applicant to withdraw his application by a written notice addressed to the Audit Officer and the applicant shall endorse a copy of the notice to the Head of Office within **fourteen days** of the date on which he receives intimation of such modification.

**29. Modification in the value specified in the Table**

(1) In case the value specified in the Table is modified at any time before the commutation becomes absolute in terms of clause (*iii*) of sub-rule (1) of rule 6, the payment shall be made in accordance with the value so modified.

(2) Where the commuted value calculated with reference to the Table as modified, is less favourable than the value determined with reference to the Table before it was so modified, the Audit Officer, shall,—

(*a*) inform the applicant of the revised value and communicate to him the provisions of sub-rule (5) of rule 28 ; and

(*b*) endorse to the Head of Office a copy of the communication issued under clause (*a*).

**30. Authorisation of payment of commuted value by the Audit Officer**

(1) Subject to the provisions of sub-rules (2) and (3) of rule 28, the Audit Officer on receipt of the documents referred to in sub-rule (2) of rule 25, from the medical authority shall, without delay, issue an order to the disbursing authority concerned and furnish to it the following particulars and documents, namely:—

(*i*) the amount of pension commuted, the amount of commuted value of pension and the date on which the commutation became absolute;

(*ii*) the amount of residuary pension;

(*iii*) Form-E in original;

(*iv*) copy of the applicant's photograph as attested by the medical authority.

(2) The Audit Officer shall also—

(*a*) bring to the notice of disbursing authority the provisions of the proviso to rule 6 regarding the date on which the amount of original pension should be reduced;

(*b*) endorse to the applicant a copy of the order issued under sub-rule (1) with the remarks that he should collect the commuted value from the disbursing authority; and

(*c*) bring to the notice of the applicant the provisions of the proviso to sub-rule (1) of rule 6.

(५) तक्त्यामध्ये फेरबदल झाल्यामुळे, अर्जदाराला प्रदेय होणारे अंशराशीकृत मूल्य हे, **नमुना "डी"** मध्ये त्याला कळविण्यात आलेल्या मूल्याहून कमी होईल असे लेखापरीक्षा अधिकाऱ्याने नियम २९ अनुसार अर्जदाराला कळविले असेल तर, त्याला आपला अर्ज, लेखापरीक्षा अधिकाऱ्याला लेखी सूचना देऊन मागे घेण्याची मुभा असेल आणि अर्जदार, अशा फेरबदलासंबंधीची माहिती कळल्याच्या तारखेपासून **चौदा दिवसांच्या आत,** त्या सूचनेची प्रत कार्यालय प्रमुखाकडे पाठवील.

## २९. तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मूल्यांमध्ये फेरबदल

(१) नियम ६ मधील पोटनियम (१) च्या खंड (तीन) अनुसार अंशराशीकरण कायम होण्यापूर्वी कोणत्याही वेळी, तक्त्यामधील विनिर्दिष्ट मूल्यामध्ये फेरबदल झाल्यास अशा फेरबदल झालेल्या मूल्यानुसार रकमेचे प्रदान करण्यात येईल.

(२) फेरबदल केलेल्या तक्त्यानुसार गणना केलेले अंशराशीकृत मूल्य हे, तक्त्यामध्ये असे फेरबदल होण्यापूर्वी निर्धारित केलेल्या मूल्यापेक्षा कमी फायद्याचे असेल, त्यावेळी लेखापरीक्षा अधिकारी—

(ए) अर्जदाराला सुधारित मूल्य आणि नियम २८ मधील पोटनियम (५) च्या तरतुदी कळवील ; आणि

(बी) खंड (ए) अनुसार लिहिलेल्या पत्राची प्रत कार्यालय प्रमुखाकडे पाठवील.

## ३०. लेखापरीक्षा अधिकाऱ्याने अंशराशीकृत मूल्याचे प्रदान प्राधिकृत करणे

(१) नियम २८ मधील पोटनियम (२) व (३) यांतील तरतुदींच्या अधीन राहून, लेखापरीक्षा अधिकारी, नियम २५ मधील पोटनियम (२) मध्ये निर्दिष्ट केलेली कागदपत्रे वैद्यकीय प्राधिकाऱ्याकडून मिळाल्यानंतर ताबडतोब, संबंधित संवितरण प्राधिकरणाला आदेश देईल आणि पुढील तपशील व कागदपत्रे पाठवील :—

(एक) अंशराशीकृत निवृत्तिवेतनाची रक्कम, निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मूल्याची रक्कम आणि अंशराशीकरण कायम झाल्याची तारीख ;

(दोन) अवशिष्ट निवृत्तिवेतनाची रक्कम ;

(तीन) मूळ **नमुना "ई"** ;

(चार) वैद्यकीय प्राधिकाऱ्याने साक्षांकित केलेली अर्जदाराच्या छायाचित्राची प्रत.

(२) तसेच लेखापरीक्षा अधिकारी हा, —

(ए) मूळ निवृत्तिवेतनाची रक्कम कोणत्या तारखेस कमी करावयाची याबाबतच्या नियम ६ च्या परंतुकामधील तरतुदी संवितरण प्राधिकरणाच्या निदर्शनास आणील ;

(बी) पोटनियम (१) अनुसार काढण्यात आलेल्या आदेशाची प्रत अर्जदाराला पाठवील आणि त्याने संवितरण प्राधिकरणाकडून अंशराशीकृत मूल्य घ्यावे असेही त्याला कळवील ; आणि

(सी) नियम ६ मधील पोटनियम (१) च्या परंतुकामधील तरतुदी अर्जदाराच्या निदर्शनास आणील.

## 31. Final assessment of provisional pension

(1) An applicant referred to in sub-rule (3) of rule 9, to whom the commuted value of the fraction of the provisional pension has been paid by the Head of Office shall, on final assessment of the pension be paid by the Audit Officer, the difference between the commuted value so determined and the commuted value already paid:

Provided that where an applicant has been examined by a Medical Officer for the commutation of a fraction of provisional pension and such an applicant on assessment of final pension becomes eligible to commute an amount exceeding *one hundred rupees* per mensem, he shall be allowed the difference between the commuted value of *one hundred rupees* per mensem and the commuted value of the fraction of the provisional pension without further medical examination but the payment of the commuted value of pension exceeding *one hundred rupees* per mensem shall be made if the applicant applies afresh for medical examination as provided in clause (*iii*) of sub-rule (3) (*b*) of rule 9, and he is declared fit by a Medical Board.

(2) The commuted value of the fraction of provisional pension as indicated in the endorsement in Form-D, addressed to the applicant and forwarded under sub-rule (4) of rule 20 shall be deemed to have been amended with the issue of an authority by the Audit Officer for the payment of difference between the commuted value of the fraction of the final pension and the fraction of the provisional pension.

## ३१. तात्पुरत्या निवृत्तिवेतनाचे अंतिम निर्धारण

(१) ज्याला कार्यालय प्रमुखाने तात्पुरत्या निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकृत मूल्य प्रदान केले आहे अशा, नियम ९ च्या पोटनियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अर्जदाराला, निवृत्तिवेतनाच्या अंतिम निर्धारणानंतर, अशा रीतीने निर्धारित केलले अंशराशीकृत मूल्य आणि अगोदरच प्रदान केलेले अंशराशीकृत मूल्य यांतील फरकाची रक्कम लेखापरीक्षा अधिकारी प्रदान करील :

मात्र असे की, तात्पुरत्या निवृत्तिवेतनाच्या काही भागाच्या अंशराशीकरणासाठी वैद्यकीय अधिकाऱ्याने एखाद्या अर्जदाराची तपासणी केली असेल, आणि तो अर्जदार निवृत्तिवेतनाच्या अंतिम निर्धारणानंतर दरमहा शंभर रुपयांहून अधिक इतक्या रकमेच्या अंशराशीकरणास पात्र ठरला असेल तर, त्या अर्जदारास दरमहा शंभर रुपयांचे अंशराशीकृत मूल्य आणि तात्पुरत्या निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकृत मूल्य यांतील फरकाची रक्कम पुन्हा वैद्यकीय तपासणीशिवाय देण्यात येईल. परंतु, नियम ९ मधील पोटनियम (३) (बी) च्या खंड (तीन) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वैद्यकीय तपासणीसाठी अर्जदाराने नव्याने अर्ज केला व वैद्यकीय मंडळाने त्याला शारीरिकदृष्टचा पात्र ठरविले तरच, त्याला दरमहा शंभर रुपयांहून अधिक असणाऱ्या निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मूल्याचे प्रदान करण्यात येईल.

(२) अर्जदाराच्या नावे लिहिलेल्या व नियम २० मधील पोटनियम (४) अनुसार पाठविलेल्या **नमुना "डी"** मधील पृष्ठांकनात दर्शविलेले तात्पुरत्या निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकृत मूल्य हे, अंतिम निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकृत मूल्य व तात्पुरत्या निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकृत मूल्य यांतील फरकाची रक्कम प्रदान करण्यासाठी लेखापरीक्षा अधिकाऱ्याने प्राधिकारपत्र दिल्यामुळे सुधारले आहे असे मानण्यात येईल.

# CHAPTER – V

# MISCELLANEOUS

## 32. Right to interpret

Where any doubt arises as to the interpretation of these rules, it shall be referred to the Government in the Finance Department for decision.

## 33. Power of relaxation

Where any Department of the Government is satisfied that the operation of any of these rules causes undue hardship in any particular case, that Department may, by order, for reasons to be recorded in writing, dispense with or relax the requirements of that rule to such extent and subject to such exceptions and conditions, as it may consider necessary for dealing with the case in a just and equitable manner:

Provided that no such order shall be made except with the concurrence of the Finance Department.

## 34. Repeal and Saving

(1) The Maharashtra Civil Services (Commutation of Pension) Rules, 1981, are hereby repealed.

(2) Notwithstanding such repeal—

(*a*) any application for commutation of pension which is pending before the commencement of these rules shall be disposed of in accordance with the provisions of rules in force immediately before the commencement of these rules, as if these rules had not been made ; and

(*b*) subject to the provisions of clause (*a*), anything done or any action taken under the rules in force immediately before the commencement of these rules, shall be deemed to have been done or taken under the corresponding provisions of these rules.

## प्रकरण—पाच

## संकीर्ण

### ३२. अर्थविवरण करण्याचा हक्क

या नियमांच्या अर्थविवरणाच्या संबंधात कोणतीही शंका उद्‌भवल्यास, निर्णयासाठी ती बाब शासनाच्या वित्त विभागाकडे पाठविण्यात यावी.

### ३३. नियम शिथिल करण्याचा अधिकार

या नियमांच्या अंमलबजावणीमुळे एखाद्या विशिष्ट प्रकरणी कर्मचाऱ्याला गैरवाजवी त्रास होत आहे अशी शासनाच्या एखाद्या विभागाची खात्री पटल्यास तो विभाग, अशा प्रकरणी न्याय्य व योग्य कार्यवाही करता यावी म्हणून आवश्यक वाटेल त्या मर्यादेपर्यंत आणि अशा अपवादांच्या व शर्तींच्या अधीन राहून व लेखी कारण नमूद करून, त्या नियमानुसार आवश्यक असलेल्या बाबींची आदेशान्वये सूट देऊ शकेल किंवा त्या शिथिल करू शकेल :

मात्र, वित्त विभागाच्या सहमतीशिवाय असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

### ३४. निरसन आणि व्यावृत्ती

(१) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८१ याद्वारे निरसित झाले आहेत.

(२) असे निरसन झाले असले तरी,—

(ए) या नियमांच्या प्रारंभापूर्वी प्रलंबित असलेला निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाचा कोणताही अर्ज, जणू काही हे नियम तयार करण्यात आले नव्हते असे मानून, या नियमांच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार निकालात काढण्यात येईल ; आणि

(बी) खंड (ए) च्या तरतुदींच्या अधीन राहून, ह्या नियमांच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या नियमांनुसार केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कार्यवाही या नियमांच्या तत्सम तरतुदींनुसार केलली आहे असे मानण्यात येईल.

# FORM–A

[*See* rules 5(2); 6(1); 12; 13(1) & (2); 14(1) & (2); 15(1) & (2) and 16(1) & (2)]

**Form of application for commutation of a fraction of pension without medical examination**

(*To be submitted in duplicate after retirement but within one year of the date of retirement.*)

## PART—I

To

The .......................................

.............................................

............................................. (here indicate the designation and full address of the Head of Office)

*Subject :* Commutation of pension without medical examination.

Sir,

I desire to commute a fraction of my pension as indicated below in accordance with the provisions contained in Maharashtra Civil Services (Commutation of Pension) Rules, 1984. The necessary particulars are furnished below:—

1. Name (in block letters) ..
2. Father's name/husband's name.
3. Designation at the time of retirement.
4. Name of Office/Department in which employed.
5. Date of birth (by Christian era).
6. Date of retirement ..
7. Class of pension ..
8. Amount of pension authorised [in case final amount of pension has not been authorised, indicate the amount of provisional pension sanctioned under rule 126 of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982].

# नमुना–ए

[ नियम ५(२) ; ६(१) ; १२ ; १३(१) व (२) ; १४(१) व (२) ; १५(१) व (२) आणि १६(१) व (२) पहा ]

## वैद्यकीय तपासणीशिवाय निवृत्तिवेतनाच्या काही भागाच्या अंशराशीकरणासाठी अर्जाचा नमुना

**[ सेवानिवृत्तीनंतर परंतु सेवानिवृत्तीच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत दोन प्रती सादर कराव्यात. ]**

### भाग–एक

..................................(येथे कार्यालय प्रमुखाचे पदनाम व
..............................संपूर्ण पत्ता नमूद करावा).
..............................यांस,

**विषय** :—वैद्यकीय तपासणीशिवाय निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण.

महोदय,

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ मधील तरतुदींनुसार खाली दर्शविण्यात आल्याप्रमाणे, मला माझ्या निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण करावयाचे आहे. आवश्यक तपशील खाली दिला आहे :—

१. संपूर्ण नाव .. ..

२. वडिलांचे नाव/पतीचे नाव

३. सेवानिवृत्तीच्या वेळी असलेले पदनाम ..

४. जेथे काम करीत असेल त्या कार्यालयाचे/विभागाचे नाव.

५. जन्मतारीख (इसवी सनानुसार) ..

६. सेवानिवृत्तीची तारीख .. ..

७. निवृत्तिवेतनाचा प्रकार.

८. प्राधिकृत करण्यात आलेली निवृत्तिवेतनाची रक्कम. [निवृत्तिवेतनाची अंतिम रक्कम प्राधिकृत करण्यात आली नसेल तर, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १२६ अन्वये मंजूर करण्यात आलल्या तात्पुरत्या निवृत्तिवेतनाची रक्कम नमूद करावी. ]

9. *Fraction of pension proposed to be commuted.
10. Designation of the Audit Officer who authorised the pension and the number and date of the Pension Payment Order, if issued.
11. **Disbursing authority for payment of pension—

    (*a*) Treasury / Sub-Treasury (Name and complete address of the Treasury/Sub-Treasury to be indicated).

    (*b*)(*i*) Branch of the Nationalised Bank with complete postal address.

    (*ii*) Bank Account number to which monthly pension is being credited each month.

Place : Signature :

Date : Postal address :............

..................................

*Note.*—The payment of commuted value of pension shall be made through the disbursing authority from which pension is being drawn. It is not open to an applicant to draw the commuted value of pension from a disbursing authority other than the disbursing authority from which pension is being drawn.

*The applicant should indicate the fraction of the amount of monthly pension (subject to maximum of one-third thereof) which he desires to commute and not the amount in rupees.

**Score out which is not applicable.

## PART-II

### Acknowledgement

Received from Shri/Smt./Kum. ..........................................

(Name) (former designation)

application in Part-I of Form-A for the commutation of a fraction of pension without medical examination.

Place : Signature :

Date : Head of Office :

*Note.*—This acknowledgement is to be signed, stamped and dated and is to be detached from the Form and handed over to the applicant. If the Form has been received by the post, it has to be acknowledged on the same day and the acknowledgement sent under registered cover.

९. *अंशराशीकरणासाठी प्रस्तावित केलेला निवृत्तिवेतनाचा भाग.

१०. निवृत्तिवेतन प्राधिकृत करणाऱ्या लेखापरीक्षा अधिकाऱ्याचे पदनाम व निवृत्तिवेतन प्रदान आदेश देण्यात आला असेल तर, त्याचा क्रमांक व दिनांक.

११.**निवृत्तिवेतनाच्या प्रदानासाठी संवितरण प्राधिकरण—

(ए) कोषागार/उपकोषागार (कोषागाराचे/उपकोषागाराचे नाव व संपूर्ण पत्ता).

(बी) (एक) राष्ट्रीयीकृत बँकेची शाखा व तिचा संपूर्ण डाक पत्ता.

(दोन) मासिक निवृत्तिवेतन ज्या बँक-खाते क्रमांकावर प्रत्येक महिन्यात जमा करण्यात येते, तो खाते क्रमांक.

ठिकाण : सही :

दिनांक : डाक पत्ता ....................

....................

....................

---

**टीप.**—जेथून निवृत्तिवेतन घेण्यात येते त्या प्राधिकरणामार्फत निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मूल्याचे प्रदान करण्यात येईल. अशा प्राधिकरणाव्यतिरिक्त इतर कोणत्याही संवितरण प्राधिकरणामार्फत निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य घेण्याची मुभा अर्जदाराला असणार नाही.

*ज्या मासिक निवृत्तिवेतनाच्या रकमेचे (कमाल एकतृतीयांश भागाच्या अधीन राहून), अर्जदार अंशराशीकरण करू इच्छितो, तो भाग येथे नमूद करावा. परंतु ती रक्कम रुपयांमध्ये नमूद करू नये.

**लागू नसलेला मजकूर खोडावा.

---

## भाग—दोन

## पोच पावती

श्री./श्रीमती/कुमारी ................................ यांच्याकडून
(नाव) (पूर्वीचे पदनाम)
वैद्यकीय तपासणीशिवाय निवृत्तिवेतनाच्या भागाचे अंशराशीकरण करण्यासंबंधातील **नमुना "ए"** च्या भाग–एकमधील अर्ज मिळाला.

ठिकाण .................. सही .............

दिनांक .................. कार्यालय प्रमुख

---

**टीप.**—या पोचपावतीवर सहीशिक्क्यानिशी दिनांक टाकावा आणि त्यानंतर ती नमुन्यापासून अलग करून अर्जदाराकडे सुपूर्द करावी. नमुना डाकेने मिळाला असेल तर, त्याची पोच त्याच दिवशी देण्यात यावी आणि ती पोचपावती नोंदणीकृत पाकिटामधून पाठवावी.

PART–III

1. Forwarded to the Audit Officer (here indicate the address and designation)

.............................................................................................

.............................................................................................

with the remarks that—

(*i*) the particulars furnished by the applicant in Part-I have been verified and are correct;

(*ii*) the applicant is eligible to get a fraction of his pension commuted without medical examination;

(*iii*) the commuted value of pension determined with reference to the Table applicable at present comes to Rs. ..................; and

(*iv*) the amount of residuary pension after commutation will be Rs. ................ .

2. It is requested that further action to authorise the payment of the amount of commuted value of pension may be taken as in rule 15 of the Maharashtra Civil Services (Commutation of Pension) Rules, 1984.

3. The receipt of Part-I of this Form has been acknowledged in Part-II which has been forwarded separately to the applicant on ........................

4. The commuted value of pension is debitable to Head of Account under Finance Department, "Demand No.........., 266–Pensions and Other Retirement Benefits—B—Commuted Value of Pensions."

Place : Signature :

Date : Head of Office :

[नमुना–ए

भाग–तीन

१. लेखापरीक्षा अधिकारी ........................... यांच्याकडे

(येथे पत्ता व पदनाम नमूद करावे)

खालील शेऱ्यांसह रवाना—

(एक) अर्जदाराने भाग–एकमध्ये दिलेला तपशील पडताळून पाहण्यात आला आणि तो बरोबर आहे ;

(दोन) वैद्यकीय तपासणीशिवाय निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण करण्यास अर्जदार पात्र आहे ;

(तीन) सध्या लागू असलेल्या तक्त्यानुसार निर्धारित करण्यात आलेले निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य रु. ................ इतके आहे; आणि

(चार) अंशराशीकरण केल्यानंतर अवशिष्ट निवृत्तिवेतनाची रक्कम रु. ...... इतकी होईल.

२. निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत रकमेचे प्रदान प्राधिकृत करण्यासंबंधातील पुढील कार्यवाही, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ मधील नियम १५ अनुसार करण्यात यावी अशी विनंती आहे.

३. या नमुन्याच्या भाग–एकची पोच, भाग–दोनमध्ये देण्यात आली असून ती ...... ..........रोजी अर्जदाराकडे स्वतंत्ररीत्या पाठविण्यात आली आहे.

४. निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य वित्त विभागाखालील "मागणी क्रमांक .........., २६६–निवृत्तिवेतने व इतर सेवानिवृत्ति लाभ—बी–निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य" या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावयाचे आहे.

ठिकाण ................ सही ...........

दिनांक ................ कार्यालय प्रमुख

# FORM – B

[*See* rules 5(2); 12; 13(3); 14(1) and 15(3)]

**Form of application for commutation of a fraction of Superannuation Pension without medical examination when applicant desires that the payment of the commuted value of pension should be authorised at the time of issue of the Pension Payment Order**

(*To be submitted in duplicate at least three months before the date of retirement.*)

## PART—I

To

The ..........................................

..........................................

.......................................... (here indicate the designation and full address of the Head of Office).

*Subject* : Commutation of pension without medical examination.

Sir,

I desire to commute a fraction of my pension as indicated below in accordance with the provisions contained in Maharashtra Civil Services (Commutation of Pension) Rules, 1984. The necessary particulars are furnished below :—

1. Name (in block letters) ..
2. Father's name/husband's name
3. Designation .. ..
4. Name of Office/Department in which employed.
5. Date of birth (by Christian era).
6. Date of retirement on superannuation.
7. *Fraction of Superannuation Pension proposed to be commuted.
8. **Disbursing authority from which pension is to be drawn after retirement—

   (*a*) Treasury/Sub-treasury (Name and complete address of the Treasury/Sub-treasury to be indicated).

## नमुना–बी

[नियम ५(२); १२; १३(३); १४(१) आणि १५(३) पहा.]

**निवृत्तिवेतन प्रदान आदेश देताना निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मूल्याचे प्रदान प्राधिकृत करण्यात यावे अशी अर्जदाराची इच्छा असेल त्यावेळी, वैद्यकीय तपासणीशिवाय नियत वयमान निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण करण्यासाठी अर्जाचा नमुना**

(सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वी किमान **तीन महिन्यांच्या** आत, दोन प्रती सादर कराव्यात.)

### भाग–एक

..............................

.............................. (येथे कार्यालय प्रमुखाचे पदनाम व संपूर्ण पत्ता नमूद करावा).

..............................

..............................यांस,

**विषय :**—वैद्यकीय तपासणीशिवाय निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण.

महोदय,

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ मधील तरतुदींनुसार, खाली दर्शविण्यात आल्याप्रमाणे मला माझ्या निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण करावयाचे आहे. आवश्यक तपशील खाली दिला आहे:—

१. संपूर्ण नाव .. ..

२. वडिलांचे नाव / पतीचे नाव .. ..

३. पदनाम .. ..

४. जेथे काम करीत असेल त्या कार्यालयाचे/विभागाचे नाव

५. जन्मतारीख (इसवी सनानुसार) ..

६. नियत वयमान सेवानिवृत्तीची तारीख ..

७. *अंशराशीकरणासाठी प्रस्तावित केलेला नियत वयमान निवृत्तिवेतनाचा भाग.

८. **सेवानिवृत्तीनंतर जेथून निवृत्तिवेतन घ्यावयाचे ते संवितरण प्राधिकरण—

(ए) कोषागार/उपकोषागार ..

(कोषागाराचे/उपकोषागाराचे नाव व संपूर्ण पत्ता).

(b)(i) Branch of the Nationalised Bank with complete postal address.
(ii) Bank Account number to which monthly pension is to be credited each month.

Signature :

Present postal address ......

........................

........................

Postal address after retirement......................

Place : ........................

........................

Date : ........................

*Note.*—The payment of commuted value of pension shall be made through the disbursing authority from which pension is to be drawn after retirement. It is not open to an applicant to draw the commuted value of pension from a disbursing authority other than the disbursing authority from which pension is to be drawn.

*The applicant should indicate the fraction of the amount of monthly pension (subject to maximum of one-third thereof) which he desires to commute and not the amount in rupees.

**Score out which is not applicable.

## PART—II

### Acknowledgement

Received from Shri/Smt./Kum. ..............................
(Name) (designation)
application in Part–I of Form–B for commutation of a fraction of pension without medical examination.

Place : Signature :

Date : Head of Office :

*Note.*—If the application has been received by the Head of Office before the expiry of **three months** before the date of retirement on superannuation, this acknowledgement should be detached from the Form and handed over to the applicant. If the form has been received by post, it has to be acknowledged on the same day and the acknowledgement sent under registered cover to the applicant. In case it is received after the specified date, it should be accepted only if it has been put into the post on or before that date subject to the production of evidence to that effect by the applicant.

(बी) (एक) राष्ट्रीयीकृत बँकेची शाखा
व तिचा संपूर्ण डाक पत्ता.

(दोन) मासिक निवृत्तिवेतन ज्या बँक
खाते क्रमांकावर प्रत्येक महिन्यात
जमा करावयाचे तो खाते क्रमांक.

सही ....................

ठिकाण .............. सध्याचा डाक पत्ता ..........

.....................

दिनांक ................ सेवानिवृत्तीनंतरचा डाक पत्ता ....

.....................

---

**टीप.**—सेवानिवृत्तीनंतर जेथून निवृत्तिवेतन घेण्यात येणार असेल, त्या प्राधिकरणामार्फत निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मूल्याचे प्रदान करण्यात येईल. अशा प्राधिकरणाव्यतिरिक्त इतर कोणत्याही संवितरण प्राधिकरणामार्फत निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य घेण्याची मुभा अर्जदाराला असणार नाही.

*ज्या मासिक निवृत्तिवेतनाच्या रकमेचे (कमाल एकतृतीयांश. भागाच्या अधीन राहून), अर्जदार अंशराशीकरण करू इच्छितो, तो भाग येथे नमूद करावा. परंतु ती रक्कम रुपयांमध्ये नमूद करू नये.

**लागू नसलेला मजकूर खोडावा.

---

## भाग—दोन

## पोच पावती

श्री./श्रीमती/कुमारी ............................... यांच्याकडून
(नाव) (पूर्वीचे पदनाम)
वैद्यकीय तपासणीशिवाय निवृत्तिवेतनाच्या भागाचे अंशराशीकरण करण्यासंबंधातील **नमुना "बी"** च्या भाग–एक मधील अर्ज मिळाला.

ठिकाण .................. सही ..............

दिनांक .................. कार्यालय प्रमुख

---

**टीप.**—नियत वयमान सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वी **तीन महिन्यांचा** कालावधी संपण्याच्या आत कार्यालय प्रमुखाला अर्ज मिळाला असेल तर, ही पोच पावती नमुन्यापासून अलग करून अर्जदाराकडे सुपूर्द करावी. अर्ज डाकेने आला असेल तर, त्याची पोच त्याच दिवशी द्यावी व ती पावती अर्जदाराकडे नोंदणीकृत पाकिटामधून पाठवावी. अर्ज विनिर्दिष्ट तारखेनंतर मिळाला असेल तर, तो त्या तारखेस किंवा त्या तारखेपूर्वी डाकेने पाठवण्यात आला याबद्दल सबळ पुरावा अर्जदाराने सादर केल्यानंतरच तो अर्ज स्वीकारण्यात यावा.

[Form—B

PART—III

1. Forwarded to the Audit Officer (here indicate the address and designation)

.........................................................

.........................................................

with the remarks that—

(*i*) the particulars furnished by the applicant in Part-I have been verified and are correct ;

(*ii*) the applicant is eligible to get a fraction of his pension commuted without medical examination ;

(*iii*) the commuted value of pension determined with reference to the Table applicable at present comes to Rs. ................; and

(*iv*) the amount of residuary pension after commutation will be Rs. ................. .

2. The pension papers of the applicant completed in all respects were forwarded under this Department/Office letter No.........., dated .......................... . It is requested that the payment of commuted value of pension may be authorised at the time of issue of the Pension Payment Order which may be issued **one month** before the retirement of the applicant.

3. The receipt of Part-I of this Form has been acknowledged in Part-II which has been forwarded separately to the applicant on

.......................... .

4. The commuted value of pension is debitable to Head of Account, under Finance Department, "Demand No........, 266—Pensions and Other Retirement Benefits—B—Commuted Value of Pensions".

Place : Signature :

Date : Head of Office.

[ नमुना–बी

## भाग–तीन

१. लेखापरीक्षा अधिकारी, ............................ यांच्याकडे
(येथे पत्ता व पदनाम नमूद करावे.)

खालील शेऱ्यांसह रवाना :—

(एक) अर्जदाराने भाग–एकमध्ये दिलेला तपशील पडताळून पाहण्यात आला आणि तो बरोबर आहे ;

(दोन) वैद्यकीय तपासणीशिवाय निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण करण्यास अर्जदार पात्र आहे ;

(तीन) सध्या लागू असलेल्या तक्त्यानुसार निर्धारित करण्यात आलेले निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य रु. ............... इतके आहे ; आणि

(चार) अंशराशीकरण केल्यानंतर अवशिष्ट निवृत्तिवेतनाची रक्कम रु. ..... इतकी होईल.

२. सर्व बाबतीत पूर्ण करण्यात आलेले अर्जदाराचे निवृत्तिवेतनविषयक कागदपत्र या विभागाचे/कार्यालयाचे पत्र क्रमांक ............ दिनांक ............. अन्वये आपणाकडे पाठवण्यात आले होते. निवृत्तिवेतन प्रदान आदेश देतेवेळी निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मूल्याचे प्रदान प्राधिकृत करण्यात यावे व तो आदेश अर्जदाराच्या सेवानिवृत्तीच्या **एक महिना** अगोदर देण्यात यावा, अशी विनंती आहे.

३. या नमुन्याच्या भाग–एकची पोच, भाग–दोनमध्ये देण्यात आली असून ती ............... रोजी अर्जदाराकडे स्वतंत्ररीत्या पाठविण्यात आली आहे.

४. निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य वित्त विभागाखालील "मागणी क्रमांक ....., २६६–निवृत्तिवेतने व इतर सेवानिवृत्ति लाभ—बी–निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य" या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावयाचे आहे.

ठिकाण .................. सही ................

दिनांक ................ कार्यालय प्रमुख.

# FORM-C

.[*See* rules 5(2); 9(3); 13(2); 14(2); 19; 20(1); (2) & (3); 21(1) and 25(2)]

**Form of application for commutation of pension after medical examination by an applicant referred to in rule 18 of the Maharashtra Civil Services (Commutation of Pension) Rules, 1984**

(*To be submitted in duplicate*)

## PART—I

| To | Space for photograph |
|---|---|
| The .................................... | |
| ............................................ | |
| ............................................ | |
| (here indicate the designation and full address of the Head of Office). | |

*Subject :* Commutation of pension after medical examination.

Sir,

I desire to commute a fraction of my pension in accordance with the provisions of the Maharashtra Civil Services (Commutation of Pension) Rules, 1984. An attested copy of my photograph is pasted on the application and an unattested copy is enclosed. The necessary particulars are furnished below :—

1. Name (in Block letters). ..
2. Father's name/husband's name.
3. Designation ..
4. Name of Office/Department in which employed.
5. Date of birth (by Christian era).
6. Date of retirement. ..
7. Class of pension [*see* Chapter-VII of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982].

# नमुना–सी

[नियम ५(२) ; ९(३) ; १३(२) ; १४(२) ; १९ ; २०(१), (२) व (३) ; २१(१) आणि २५(२) पहा.]

## महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ मधील नियम १८ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे वैद्यकीय तपासणीनंतर निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण करण्यासाठी अर्जाचा नमुना

(दोन प्रती सादर कराव्यात)

### भाग–एक

छायाचित्राकरिता जागा

(येथे कार्यालय प्रमुखाचे पदनाम व संपूर्ण पत्ता नमूद करावा.)
..............................
.............................. यांस

**विषय :**—वैद्यकीय तपासणीनंतर निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण

महोदय,

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ च्या तरतुदींनुसार, मला माझ्या निवृत्तिवेतनाच्या काही भागाचे अंशराशीकरण करावयाचे आहे. माझ्या छायाचित्राची साक्षांकित केलेली एक प्रत अर्जावर चिकटविली आहे व साक्षांकित न केलेली एक प्रत यासोबत जोडली आहे. आवश्यक तो तपशील खाली दिला आहे :—

१. संपूर्ण नाव. .. ..

२. वडिलांचे नाव/पतीचे नाव

३. पदनाम .. ..

४. जेथे काम करीत असेल त्या कार्यालयाचे/विभागाचे नाव.

५. जन्मतारीख (इसवी सनानुसार) ..

६. सेवानिवृत्तीची तारीख .. ..

७. निवृत्तिवेतनाचा प्रकार [महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील प्रकरण–सात पहा].

8. Amount of pension authorised (indicate the amount of provisional pension if full pension not authorised).

9.* Fraction of pension proposed to be commuted.

10. Designation of the Audit Officer who authorised the pension and the number and date of the Pension Payment Order.

11.** Disbursing authority for payment of pension :—

(*a*) Treasury / Sub-treasury (Name and complete address of the Treasury / Sub-treasury to be indicated).

(*b*) (*i*) Branch of the Nationalised Bank with complete postal address.

(*ii*) Bank Account number to which monthly pension is being credited each month.

12. Approximate date from which commutation is desired to have effect.

13. The amount of pension already commuted, if any.

14. Preference for station where medical examination is desired to take place.

Signature ......................

Postal address ....................

Place : ....................................

Date : ....................................

*Note.*—The payment of commuted value of pension shall be made through the disbursing authority from which pension is being drawn. It is not open to an applicant to draw the commuted value of pension from a disbursing authority other than the authority from which pension is being drawn.

*The applicant should indicate the fraction of the amount of monthly pension (subject to maximum of one-third thereof) which he desires to commute and not the amount in rupees.

**Score out which is not applicable.

८. प्राधिकृत करण्यात आलेली निवृत्तिवेतनाची रक्कम (निवृत्तिवेतनाची संपूर्ण रक्कम प्राधिकृत करण्यात आली नसेल तर तात्पुरत्या निवृत्ति-वेतनाची रक्कम नमूद करावी).

९. *अंशराशीकरणासाठी प्रस्तावित केलेला निवृत्तिवेतनाचा भाग.

१०. निवृत्तिवेतन प्राधिकृत करणाऱ्या लेखापरीक्षा अधिकाऱ्याचे पदनाम आणि निवृत्तिवेतन प्रदान आदेशाचा क्रमांक व दिनांक.

११. **निवृत्तिवेतनाच्या प्रदानासाठी संवितरण प्राधिकरण—

(ए) कोषागार/उपकोषागार (कोषागाराचे/उपकोषागाराचे नाव व संपूर्ण पत्ता)

(बी) (एक) राष्ट्रीयीकृत बँकेची शाखा व तिचा संपूर्ण डाक पत्ता.

(दोन) मासिक निवृत्तिवेतन ज्या बँक खाते क्रमांकावर प्रत्येक महिन्यात जमा करण्यात येते, तो खाते क्रमांक.

१२. ज्या तारखेपासून अंशराशीकरण करण्याची इच्छा असेल ती अंदाजित तारीख.

१३. निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण अगोदर करण्यात आले असेल तर निवृत्तिवेतनाची रक्कम.

१४. ज्या ठिकाणी वैद्यकीय तपासणी करून घेण्याची इच्छा असेल ते पसंतीचे ठिकाण.

ठिकाण ................ सही ..............

दिनांक ................ डाक पत्ता ..............

---

**टीप.**—जेथून निवृत्तिवेतन घेण्यात येते, त्या प्राधिकरणामार्फत निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकृत मूल्याचे प्रदान करण्यात येईल. अशा प्राधिकरणाव्यतिरिक्त इतर कोणत्याही संवितरण प्राधिकरणामार्फत निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य घेण्याची मुभा अर्जदाराला असणार नाही.

*ज्या मासिक निवृत्तिवेतनाच्या रकमेचे (कमाल एकतृतीयांश भागाच्या अधीन राहून), अर्जदार अंशराशीकरण करू इच्छितो, तो भाग येथे नमूद करावा. परंतु ती रक्कम रुपयांमध्ये नमूद करू नये.

**लागू नसलेला मजकूर खोडावा.

PART—II

**Acknowledgement**

Received from Shri/Smt./Kum. ........................................
(Name) (Designation)
application in Part—I of Form - C for commutation of a fraction of pension after medical examination.

Place :

Signature

Date : Head of Office

---

PART—III

Forwarded to the Audit Officer (here indicate the address and designation)
..........................................................................
with the remarks that the particulars furnished by the appiicant in Part—I have been verified and are correct and the applicant is eligible to get a fraction of his pension commuted after medical examination.

2. It is requested that Part—IV of this Form may be completed and returned to this office as early as possible.

Place :

Signature

Date : Head of Office

## भाग-दोन

## पोच पावती

श्री./श्रीमती/कुमारी ........................................ यांच्याकडून

(नाव) (पूर्वीचे पदनाम)

वैद्यकीय तपासणीनंतर निवृत्तिवेतनाच्या भागाचे अंशराशीकरण करण्यासंबंधातील **नमुना "सी"** च्या भाग-एकमधील अर्ज मिळाला.

ठिकाण .................. सही .................

कार्यालय प्रमुख

दिनांक ..................

---

## भाग-तीन

अर्जदाराने भाग-एकमध्ये दिलेला तपशील पडताळून पाहण्यात आला व तो बरोबर आहे. वैद्यकीय तपासणी करण्यात आल्यानंतर निवृत्तिवेतनाच्या भागाचे अंशराशीकरण करण्यास अर्जदार पात्र आहे, या शेऱ्यांसह लेखापरीक्षा अधिकारी ........................................................ यांच्याकडे

(येथे पदनाम व पत्ता नमूद करावा)

पाठविण्यात येत आहे.

२. या नमुन्याचा भागचार पूर्ण करून, शक्य तितक्या लवकर, या कार्यालयाकडे परत पाठवण्यात यावा अशी विनंती आहे.

ठिकाण .................. सही ...............

कार्यालय प्रमुख

दिनांक ..................

[Form—C

## PART—IV

## (To be completed by the Audit Officer)

1. Name of the applicant
2. Date of birth (by Christian era)
3. Date of retirement
